# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक २४ जून, २०२६ / आषाढ ३, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | वैद्यकीय शिक्षण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | मृद व जलसंधारण मंत्री | |
| (४) | उद्योग, मराठी भाषा मंत्री | |
| (५) | महिला व बालविकास मंत्री | |
| (६) | ग्रामविकास व पंचायत राज मंत्री | |
| (७) | कामगार मंत्री | |
| (८) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |

---------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

-------------------------------

**प्रधानमंत्री आवास योजना व इतर योजनेतील घरकुलांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत**

**(१) * ३२४०६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.निलेश राणे (कुडाळ), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच इतर घरकुल योजनांच्या लाभार्थ्यांना देय असलेल्या निधीचे हप्ते मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याने अनेक घरकुलांचे बांधकाम अपूर्णावस्थेत असून प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)-२ अंतर्गत राज्यात एकूण मंजूर घरांपैकी केवळ १२ टक्केच घरे पूर्ण झाली असून उर्वरित २४ लाख २९,९९८ घरकुलांची कामे अद्याप अपूर्ण असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील १२ हजार, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १५९०२, चंद्रपूर जिल्ह्यातील ४६२००, जळगाव जिल्ह्यातील १ लाखाहून अधिक, सोलापूर जिल्ह्यातील ९५ हजाराहून

अधिक, हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ३२००, लातूर जिल्ह्यातील ६५७४३, वाशिम जिल्ह्यातील हजारो घरकुले, पालघर जिल्ह्यातील ३९१५६, नांदेड जिल्ह्यातील लाखो घरे, परभणी जिल्ह्यातील १ लाख,जालना (भोकरदन) व नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागाप्रमाणेच उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्र इ. ठिकाणची घरकुलांची कामे अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाला परंतू अनेक लाभार्थी दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व त्यापुढील लाभापासून वंचित असून शासनाकडून हप्ते वेळेत न मिळणे, 'स्पर्श' प्रणालीतील तांत्रिक त्रुटी, सर्व्हर डाऊन होणे, फोटो अपलोड न होणे तसेच प्रशासकीय विलंब यांमुळे घरकुलांची कामे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहेत तसेच वाढती महागाई, सिमेंट, लोखंड, विटा व वाळूच्या वाढलेल्या किमंतीमुळे शासनाकडून मिळणारे अनुदान अपुरे पडत असून अनेक लाभार्थींना उधारी अथवा कर्ज काढून घरकुल बांधकाम सुरू करावे लागले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हप्ते प्रलंबित असल्यामुळे अनेक लाभार्थींनी जुनी घरे पाडल्यानंतर अपूर्ण घरकुलांमुळे उन्हाळयात तात्पुरत्या निवाऱ्यात राहण्याची वेळ आली असून पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये वारंवार चकरा मारूनही त्यांना समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने घरकुलांचे प्रलंबित हप्ते तातडीने वितरित करणे, 'स्पर्श'प्रणालीतील तांत्रिक अडचणी दूर करणे, वाढत्या बांधकाम खर्चाच्या पार्श्वभूमीवर अनुदान वाढविणे तसेच अपूर्ण घरकुलांची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१), (२), (३), (४) व (५) प्रधानमंत्री आवास योजना या योजनेंतर्गत SNA SPARSH प्रणाली लागू झाली. सदर योजनेसाठी माहे एप्रिल,२०२६ ऐवजी माहे मे, २०२६ मध्ये निधी प्राप्त झाला. केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनेसाठी पर्याप्त निधी उपलब्ध असून लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केला जात आहे.

वाढत्या महागाईचा विचार करून राज्याने दिनांक ०४ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये टप्पा-२ मधील लाभार्थ्यांना रु.५०,०००/- इतके अतिरिक्त अनुदान मंजूर केले आहे. या शिवाय राज्याने दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तांत्रिक अडचणी सोडवून SNA SPARSH प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात हप्ते वितरणाची प्रक्रिया ऑनलाईन होत असल्याने लाभार्थ्यांना पाठपुरावा करण्याची आवश्यकता राहिलेली नाही.

तात्पुरत्या निवाऱ्यात राहणाऱ्या लाभार्थ्यांना प्राधान्य देऊन त्यांचे घरांचे बांधकाम पावसाळ्यापूर्वी कालबध्द नियोजन करुन छताच्या पातळीपर्यंत पूर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गृहनिर्माण अभियंता, ग्रामसेवक यांचेद्वारे थेट बांधकामावर भेट देवून मार्गदर्शन व सहाय्य केले जात आहे, जेणेकरून लाभार्थ्यांची गैरसोय होणार नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात तोतया (बोगस) डॉक्टरांवर कारवाई करणेबाबत

**(२) * ३५८९८ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात गेल्या १३ वर्षांत तोतया (बोगस) डॉक्टरांवर केवळ ८७ गुन्हे दाखल झाले असून त्यांनी

दिलेल्या चुकीच्या उपचारामुळे उपळाई ठोंगे येथील रुग्णाचा मृत्यू झाल्याची घटना माहे मे, २०२६ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात अनेक ठिकाणी ‘बंगाली फेम’ व ‘कंपाऊंडर’ म्हणून काम केलेले व्यक्ती डॉक्टर म्हणून व्यवसाय करत असून त्यामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्था धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जिल्हाधिकारी व आरोग्य विभागामार्फत विशेष मोहीम राबवून तोतया (बोगस) डॉक्टरांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करून कारवाई करण्यासह उक्त प्रकार रोखण्यासाठी धोरण निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) दिनांक १३.०२.२०२५ रोजी संचालक, वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात निधीचा विनियोग पारदर्शक व नियमांनुसार करणेसह नेत्र रोग विभागाच्या इमारतीचे बांधकाम करणेबाबत

**(३) * ३२४९१ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील विद्यमान अधिष्ठाता यांच्या कार्यकाळात झालेल्या गंभीर अनियमितता, गैरव्यवस्थापन व गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात दर्जेदार वैद्यकीय सेवा देण्यासाठी प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग पारदर्शक पद्धतीने व नियमांनुसार करण्यात आलेला नसून गैरव्यवस्थापनामुळे औषधांचा तुटवडा भासत असून मूलभूत वैद्यकीय सुविधांचा देखिल अभाव असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, या रुग्णालयातील नेत्र रोग विभाग दहा-बारा वर्षापासून कुटुंब कल्याण केंद्राच्या इमारतीत स्थलांतरीत करण्यात आला असून या विभागांस नवीन इमारत बांधण्यासाठी तांत्रिक पूर्ततेसाठी अस्तित्वातील इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासाठी प्रशासनाने रु.४.०० लाख इतकी रक्कम न भरल्यामुळे या इमारतीचे बांधकाम व डागडूजी अजूनही न होऊ शकल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रुग्णालयात झालेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करणेसह वैद्यकीय सेवेसाठी प्राप्त निधीचा विनियोग पारदर्शक व नियमांनुसार करणे तसेच नेत्र रोग विभागाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीटची फी भरून संबंधित इमारतीच्या बांधकामाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.
दिनांक ११ जून, २०२६ रोजीच्या शासन पत्रान्वये सदर प्रकरणी तपासणी करुन अहवाल सादर करण्याच्या

सूचना आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांना दिल्या आहेत.
(२) नाही.

संचालनालयाच्या अखत्यारीतील रुग्णालयांना औषधे व तदनुषंगिक बाबींचा पुरवठा महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे. तसेच संस्थास्तरावर राज्य निधी, संस्थेचे स्वीय प्रपंजी खाते तसेच जिल्हा नियोजन व विकास परिषदेकडून प्राप्त निधीच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर औषधांची खरेदी शासनाच्या प्रचलीत नियमानुसार करण्यात येते. याशिवाय महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना सदर योजनेतून रुग्णोपचार व औषधोपचार उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच रुग्णालयात नियमित पाणीपुरवठा, रुग्ण व त्यांच्या नातेवाईक यांचेकरिता सार्वजनिक स्वच्छतागृह, प्रतिक्षालय, पिण्याचे स्वच्छ पाणी इत्यादी मुलभूत सुविधा देण्यात येते.
(३) व (४) नाही.

नेत्ररोग विभागाकरीता नवीन इमारतीचे बांधकाम करण्याच्या अनुषंगाने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांच्या दिनांक २५.०२.२०२६ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये VNIT, Nagpur या संस्थेला रु. ४.७२ लाख इतकी रक्कम दिनांक ०५.०३.२०२६ रोजी अदा करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदरहू स्ट्रक्चरल ऑडीटचा अहवाल प्राप्त होताच नेत्ररोग विभागाकरिता नवीन इमारतीचे बांधकाम करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बालविवाहाची अनिष्ट प्रथा रोखण्यासाठी प्रभावी मोहीम राबविण्याबाबत

**(४) * ३२५७० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार परभणी जिल्ह्यात ४८ टक्के,बीड जिल्ह्यात ४३.७ टक्के, धुळे जिल्ह्यात ४०.५ टक्के, सोलापूर जिल्ह्यात ४०.३ टक्के, हिंगोली जिल्ह्यात ३७.१ टक्के, धाराशिव जिल्ह्यात ३६.६ टक्के मुलींचे विवाह १८ वर्षांपेक्षा कमी वयात झाले असून, बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ अन्वये बालविवाह हा गंभीर गुन्हा असतानाही जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अनेक गावांमध्ये बालविवाहाची अनिष्ट प्रथा उघडपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षणावर तसेच आरोग्यावर परिणाम होत असून मातामृत्यू आणि कुपोषणाचे प्रमाणही वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक ग्राम बाल संरक्षण समित्या, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका आणि पोलीस पाटील हे या गंभीर प्रकरणांकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून केंद्र शासनाची चाइल्ड हेल्पलाईन १०९८ ही सेवा दुर्गम भागात पोहचत नसून तिचा प्रसार देखील होत नसल्याने गरजू मुलींना वेळेवर मदत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात बालविवाह रोखण्यासाठी राजस्थानच्या धर्तीवर राज्यातही लग्नपत्रिकेवर वर-वधूची जन्मतारीख छापणे बंधनकारक करावे अशी शिफारस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने शासनाला केल्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली विविध विभागांचे ‘विशेष संयुक्त पथक’ स्थापन करून बालविवाह रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बालविवाह रोखण्याच्या कर्तव्यपालनात कसूर करणाऱ्या स्थानिक जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे तसेच बालविवाहाच्या प्रमाणात होणारी वाढ रोखण्यासाठी राज्यात बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणेसह जनजागृती मोहीम आखणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे दाखल झालेल्या बाल विवाहाशी संबंधित प्रकरणांच्या अनुषंगाने बालविवाह प्रतिबंधासाठी प्रभावी उपाययोजनांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने दि.०६/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये राजस्थान राज्य शासनाकडे कार्यपद्धतीविषयक मार्गदर्शक सूचनांचा अहवाल मागविला आहे.
(५) राज्यामध्ये बालविवाह रोखण्यासाठी बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ कार्यान्वित असून महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम, २०२२ तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील ग्रामीण भागासाठी ग्राम सेवकांना तसेच नागरी भागासाठी नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात बाल विवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच, त्यांना सहाय्य करण्यासाठी अनुक्रमे अंगणवाडी सेविका व अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना सहाय्यक बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी घोषित करण्यात आलेले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षा मार्फत बाल विवाहाच्या प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन नियमितपणे करण्यात येते.

केंद्र शासनाच्या "बाल विवाह मुक्त भारत अभियान" या मोहिमेंतर्गत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये बाल विवाह प्रथा संपूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी मोहिम राबविण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात उभारण्यात आलेल्या हिरकणी कक्षाची झालेली दुरवस्था

**(५) * ३५३७८ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक तालुक्यांच्या ठिकाणी महिला व बालविकास विभागामार्फत उभारलेला 'हिरकणी कक्षाचा' यांचा वापर अडगळीचे साहित्य ठेवण्यासाठी केला जात असल्याचे माहे मे,२०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातून शासकीय कामासाठी येणाऱ्या महिला, शासकीय कार्यालयात काम करण्या-या महिला तसेच सार्वजनिक ठिकाणी उदा. बस स्थानके येथे येणाऱ्या महिलांना त्यांच्या लहान बालकांना सुरक्षित व स्वच्छ वातावरणात स्तनपान करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा नियोजन समितीच्या तीन टक्के निधीतून लाखो रुपये खर्च करून एसी, गादीसह पलंग व

खुर्च्या यांसारख्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करूनही हा कक्ष वापराविना असल्याने शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, गोंदिया जिल्ह्यात १८ हिरकणी कक्षांसाठी रु. २ कोटी १८ लाख इतका निधी मंजूर करण्यात आला असून प्रति कक्ष रु.१२ लाख ६८ हजार इतका खर्च निश्चित करण्यात आला तर जालना जिल्ह्यात १५ हिरकणी कक्षांसाठी रु. १ कोटी इतका निधी मंजूर करून प्रति कक्ष केवळ रुपये ९७ हजार ६८० इतका खर्च निश्चित करण्यात आला असल्याने एकाच योजनेसाठी जिल्हानिहाय मंजूर निधीमध्ये तफावत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार हिरकणी कक्ष तातडीने कार्यान्वित करून त्याच्या देखभालीची जबाबदारी निश्चित करणे, एक समान निधीची तरतूद करणेसह भविष्यात सदर कक्षांची दुरवस्था टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

(२) शासकीय कार्यालयामध्ये तसेच सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी जेथे आवश्यकता आहे, अशा ठिकाणी हिरकणी कक्ष उभारणेसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत स्थानिक पातळीवर निर्णय घेण्यात येतो.

(३) हिरकणी कक्षाचा वापर गरजू महिलांकडून करण्यात येत आहे.

(४) व (५) सन २०२५-२६ या वर्षात गोंदिया जिल्हयात विविध ठिकाणी/ शासकीय कार्यालयात एकूण १८ हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आले आहे. सदर हिरकणी कक्ष स्थापन करण्यासाठी अंदाजपत्रकातील घटकानुसार प्रती हिरकणी कक्ष रु.१२.६८ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

तसेच, जालना जिल्हयात १५ हिरकणी कक्ष जिल्हा नियोजन समितीकडून नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत मंजूर करण्यात आले आहेत. जालना जिल्हयात हिरकणी कक्ष स्थापन करण्यासाठी अंदाजपत्रकातील घटकानुसार प्रती हिरकणी कक्ष रु.९.७६ लक्ष इतका खर्च निश्चित करण्यात आला आहे.

उपरोक्त दोन्ही जिल्हयातील हिरकणी कक्षात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सोयी सुविधा/साहित्यांच्या अनुषंगाने मंजूर निधीमध्ये तफावत दिसून येत आहे.

हिरकणी कक्षाची उभारणी ज्या कार्यालयात/विभागांतर्गत करण्यात आलेली आहे, त्या कार्यालय/विभागाकडून देखभाल करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खारे कर्जुने (ता.जि.अहिल्यानगर) येथे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

**(६) * ३२६०० श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारे कर्जुने (ता.जि.अहिल्यानगर) येथील प्रधानमंत्री आवास योजनेत घरकुलाचा दुसरा हप्ता देण्याच्या बदल्यात तेथील ग्रामसेविका व अहिल्यानगर पंचायत समितीच्या गृहनिर्माण अभियंता यांना रुपये १० हजार इतक्या रक्कमेची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २२ एप्रिल,२०२६ रोजी वा त्यादरम्यान पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्याअनुषंगाने संबंधीत दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन दोन्ही अपचाऱ्यांविरुद्ध पोलीस ठाणे एम.आय.डी.सी, ता. जि. अहिल्यानगर येथे गु.क्र.०२६२/२०२६ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. संबंधित ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत खारे कर्जुने यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांनी दि.०८/०६/२०२६ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे. पंचायत समिती, अहिल्यानगर कार्यालयाने दि.११/०५/ २०२६ च्या आदेशान्वये संबंधित ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) यांना सेवेतून कार्यमुक्त केले आहे. तसेच, ग्रामपंचायत खारे कर्जुने येथील कार्यालयीन दप्तराची सखोल तपासणी / छाननी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र महिलांना लाभ मिळवून देण्याबाबत

**(७) * ३३४४५ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी परिस्थिती, तीव्र उष्णतेची लाट , आवश्यक कागदपत्रांअभावी तसेच वैयक्तिक किंवा कुटुंबाचे उत्पन्न रुपये तीन लाखाच्या आत असतानाही अनेक गरीब व गरजू पात्र महिला 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेच्या लाभासाठी अनिवार्य असलेले ई-केवायसी (e-KYC) प्रक्रिया पूर्ण न केल्याने अपात्र होणार असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या योजनेच्या पडताळणीत १२ हजार ४१५ शासकीय महिला कर्मचाऱ्यांसह पुरुष आणि अडीच लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या अपात्र व्यक्तींनी खोटी माहिती देऊन जवळपास रु.१६५ कोटी इतका लाभ घेतला असल्याने शासनाच्या निधीचा अपहार व गैरविनियोग झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भविष्यात अशा योजना राबविताना सुरुवातीलाच सक्षम ई-केवायसी पडताळणी अनिवार्य करण्यासह मूळ पात्र महिलांना ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त मुदतवाढ देण्याबाबत तसेच अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांकडून तातडीने रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची ओळख पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC च्या माध्यमातून Aadhaar Authentication करण्यात आलेले आहे. त्यानुसार e-KYC प्रक्रिया पूर्ण न केलेल्या लाभार्थांचा लाभ थांबविण्यात आला आहे.

(२) व (३) "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेतंर्गत शासकीय महिला कर्मचारी यांनी लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर कर्मचारी यांच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही व रक्कम वसुल करण्याबाबत संबंधित विभागास अवगत करण्यात आले आहे. तसेच पुरुष यांनी लाभ घेतल्याचे प्रथम दर्शनी दिसून आल्याने त्यांचा आर्थिक लाभ थांबविण्यात आला आहे. तसेच त्यांच्याकडून Revenue Recovery Receipt नुसार आर्थिक लाभाची रक्कम वसुल करण्याच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना e-KYC प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासन निर्णय दि.१८.०९.२०२५ अन्वये दि.१८.११.२०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तद्नंतरही अनेक लाभार्थी महिलांनी e-KYC प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्याने त्यांना दि.३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना e-KYC प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुरेशी संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर विभागात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एम.आय.डी.सी.) अनेक उद्योगांना दिलेले भूखंड वापराअभावी असल्याबाबत**

**(८) * ३३४११ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भाच्या औद्योगिक विकासाला नवी उभारी देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एम.आय.डी.सी.) नागपूर विभागांतर्गत येणाऱ्या नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि वर्धा या पाच जिल्ह्यामध्ये एकूण ६४२९ भूखंडाचे वाटप केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामधील ३०१ उद्योगांनी भूखंड घेवून नियमानुसार अनेक वर्षांपासून उद्योग सुरु न करता ऐन मोक्याच्या जागा कब्जा करुन स्वत:कडे ठेवल्या असल्याची बाब दिनांक २४ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, या चार जिल्ह्यांतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एम.आय.डी.सी.) वाटप केलेले १२०० हून अधिक उद्योग बंद आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बंद पडलेल्या किंवा सुरु न केलेल्या उद्योगांची जागा शासनाने तातडीने ताब्यात घ्यावी असे शासनाचे धोरणात्मक निर्णय असताना अधिकारी आणि उद्योजकांच्या संगनमताने करोडो रुपयांची जागा बळकविण्याचा प्रयत्न करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बंद पडलेल्या किंवा सुरु न केलेल्या उद्योगांची जागा बळकविण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधित उद्योजकांवर व त्यांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह सदरहू भूखंड तातडीने ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
नागपूर, वर्धा, गोंदिया व भंडारा जिल्ह्याकरीता एकूण ८११४.८७ हे.आर जागा संपादित करण्यात आली असून, ७३७० भूखंडांचे आरेखन करण्यात आलेले आहे. त्यापैकी ६४५३ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून, ४१४६ भूखंडावर उद्योग घटक सुरु आहेत.
(२) हे खरे नाही.
नागपूर,वर्धा,गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये वाटप करण्यात आलेल्या भूखंडापैकी ३०१ भूखंडावरील उद्योग घटक बंद आहेत. सदरहू उद्योग घटक सुरु करण्याबाबत संबंधित उद्योग घटकास नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.
(३),(४) व (५) हे खरे नाही.
विदर्भातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (MIDC) औद्योगिक वसाहतीमध्ये वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचा विकास कालावधी संपलेला असेल तर सदर भूखंड मऔवि महामंडळाच्या धोरणानुसार परत घेण्यात येतात. त्यामुळे ज्या भूखंडावर विकासात्मक कार्यवाही केलेली नाही ते भूखंड मऔवि

महामंडळाकडे परत घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कार्यरत निवासी डॉक्टरांच्या समस्यांचे निराकरण करणेबाबत

**(९) * ३६२१३ श्री.रोहित पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये रुग्णसेवेची जबाबदारी सांभाळणारे निवासी डॉक्टर मानसिक ताण तणावाखाली काम करीत असल्याने त्याचा गंभीर परिणाम त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत असल्याचे फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशनच्या निरीक्षणातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवासी डॉक्टरांच्या मानसिक तणावाचे मुख्य कारण हे सलग कामाचे तास, मनुष्यबळाची कमतरता,आरोग्यविषयक अपुऱ्या सोयी, अपुरी विश्रांती, वसतिगृह मधील असुविधा, रुग्णांचा वाढता ताण, सुरक्षेचा अभाव, वरिष्ठ अधिकारी व प्राध्यापकांकडून होणारा दबाव, मानसिक छळ तसेच अल्प मानधन असल्यामुळे निवासी डॉक्टरांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निवासी डॉक्टरांचे मानसिक व शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी समुपदेशन केंद्रे, कामाच्या तासांवर मर्यादा, सुरक्षा व्यवस्था, रिक्त पदे भरणे व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशनचा सदरचा निरीक्षण अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वसतिगृह व्यवस्था, मेस/कॅन्टीन, व्यायामशाळा इत्यादी सुविधा निवासी डॉक्टरांसाठी उपलब्ध आहेत. तसेच निवासी डॉक्टरांच्या सुरक्षिततेबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील परदेशी वैद्यकीय पदवीधारक विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया सुलभ व जलद गतीने करणेबाबत

**(१०) * ३३७५८ श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश बालदी (उरण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती**

**मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राहूल कुल (दौंड), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थी परदेशात शिक्षण घेऊन आल्यानंतर घेण्यात येणारी परदेशी वैद्यकीय पदवीधर परीक्षा एफएमजीई (फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झॉमिनेशन) यासाठी सध्या नोंदणी प्रक्रियेत विलंब होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून (एमएमसी) कायमस्वरूपी नोंदणीबाबत स्पष्ट निर्देश मिळत नसल्याने सुमारे दोन हजारांहून अधिक विदेशी वैद्यकीय पदवीधर विद्यार्थी नोंदणीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परदेशात सर्व निकष पूर्ण करूनही नोंदणी मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तसेच व्यावसायिक करिअर बाधित होत असून त्यांना पुन्हा भारतात अतिरिक्त इंटर्नशिप करण्याची अट घालण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक होणारे नुकसान टाळण्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुलभ व जलद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशतः खरे आहे. राज्यातील विद्यार्थी परदेशात वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आल्यानंतर त्यांना परदेशी वैद्यकीय पदवीधर परीक्षा (Foreign Medical Graduates Examination) उत्तीर्ण होणे आवश्यक असते. सदर परीक्षा राष्ट्रीय परीक्षा मंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत दरवर्षी माहे जून व डिसेंबर महिन्यात आयोजित केली जाते. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे तात्पुरत्या अथवा कायमस्वरूपी नोंदणीसाठी अर्ज करू शकतात. नोंदणी प्रक्रियेतील पडताळणीस लागणाऱ्या कालावधीमुळे विलंब होतो.

(२) अंशतः खरे आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाची स्वतंत्र व सविस्तर पडताळणी करण्यात येते. परदेशी वैद्यकीय पदवीधरांना नोंदणी देण्यापूर्वी राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (National Medical Commission), माजी भारतीय वैद्यकीय परिषद (Medical Council of India) यांच्या नियमावली, सार्वजनिक सूचना, परिपत्रके व लागू असलेल्या वैधानिक तरतुदींनुसार विविध कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक असते. पडताळणीदरम्यान बाह्य प्राधिकरणांकडून प्राप्त होणाऱ्या अहवालांवर अवलंबून असल्याने नोंदणी प्रक्रियेस काही कालावधी लागू शकतो.

(३) अंशतः खरे आहे. Foreign Medical Graduates यांना तात्पुरती व कायमस्वरूपी नोंदणी देताना खालील नियम व कायदेशीर तरतुदी लागू होतात : १. Medical Council of India Screening Test Regulations, २००२ २. National Medical Commission Foreign Medical Graduate Licentiate Regulations, २०२१ ३. Eligibility Requirement for Admission in Foreign Medical Institutions Regulations, २००२ ४. Compulsory Rotating Medical Internship Regulations, २०२१ ५. National Medical Commission Act, २०१९ राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या दि. ०७ डिसेंबर २०२४, १९ जून २०२४ आणि १८ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या सूचनांनुसारः • कोविड काळात किंवा इतर कारणांमुळे ऑनलाइन पद्धतीने पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाची भरपाई (onsite compensation) मूळ शिक्षण संस्थेत प्रत्यक्ष वर्गाद्वारे झाली नसल्यास, • संबंधित विद्यार्थ्यांना एक किंवा दोन वर्षांची अतिरिक्त क्लार्कशिप/इंटर्नशिप पूर्ण करणे आवश्यक ठरू शकते. उपरोक्त सूचनांनुसार ऑनलाइन शिक्षणाच्या बदल्यात आवश्यक प्रत्यक्ष प्रशिक्षण (Onsite Compensation) पूर्ण झाले आहे किंवा नाही याचीही पडताळणी करण्यात येते. तदनंतर एक किंवा दोन वर्षांची आंतरवासियता (Internship) पूर्ण करणे बंधनकारक ठरते.

(४) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ व गतिमान करण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. आवश्यक पडताळणी प्रलंबित असली तरी "Subject to Verification of Embassy and Board" या अटीस अधीन राहून तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

२. १०+२ Board Verification, FMG Screening Test Verification, Embassy Verification आणि University Verification या प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहेत. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या नोंदणी प्रक्रियेत अनावश्यक विलंब होऊ नये यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वलप (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीमध्ये बनावट जन्म नोंदणी प्रमाणपत्रे तयार केल्याबाबत**

**(११) * ३४४०३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश बालदी (उरण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वलप (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या युजर आयडी व पासवर्डचा गैरवापर करून सुमारे २ हजार ६६० बनावट जन्म नोंदणी प्रमाणपत्रे तयार करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने किती आरोपींना अटक करण्यात आले व त्यांच्यावर कोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले व सदर प्रकरणात बनावट जन्म नोंदणी प्रमाणपत्रे तयार करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह भविष्यात अशा घटना रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१), (२) वलप (ता. पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या नागरी नोंदणी प्रणाली (CRS) वरील Add Old Event या पर्यायाचा अवलंब करून डिजिटाइज्ड करण्यात आलेल्या जुन्या जन्म नोंदींची समीक्षा करतेवेळी २६६० जन्म नोंदी या बनावट असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले.

बनावट जन्म नोंदी रद्द करण्याबाबतची कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली. तसेच नवीन पनवेल, नवी मुंबई पोलीस ठाणे येथे प्रथम खबर अहवाल (FIR) रजि.क्र. ५१/२०२६ नोंदविला आहे. सदर प्रकरणी भा.न्या.सं. भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ३३८, ३१८(४), ३३६ (३), ३४० सह, आय.टी. ॲक्ट कलम ४३, ६६ सी, ६६ (ड) या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून ०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिस निरीक्षक गुन्हे, पनवेल तालुका पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचेमार्फत पुढील तपास व कार्यवाही सुरू आहे.

तसेच dc.crsorgi.gov.in ही ऑनलाईन संगणक प्रणाली वापरताना घ्यावयाची दक्षता व प्रणाली SOP (Standard Operating Procedure) अनुसार योग्यरीत्या हाताळण्याबाबत सर्व निबंधक जन्म-मृत्यू यांना वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचे कार्यालयामार्फत सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दहिफळ (वड) (ता. केज, जि. बीड) येथील जिल्हा परिषद शाळा वर्गखोली बांधकाम निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(१२) * ३३६४८ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत दहिफळ (वड) (ता. केज, जि. बीड) अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (DPC) अंतर्गत मंजूर वर्गखोली बांधकामाच्या कामासाठी प्रशासकीय आदेश दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ व कार्यारंभ आदेश दिनांक ५ जानेवारी, २०२६ नुसार देण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत सरपंच यांच्या बनावट (बोगस) सहीचा वापर झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास , सदर प्रकरणात बनावट सही, फसवणूक व बनावट दस्तऐवजांचा वापर करून शासन निधीचा गैरवापर झाल्याची तक्रार सरपंच, ग्रामपंचायत दहिफळ (वड) यांनी प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकारांचा गैरवापर झाल्याच्या पार्श्वभूमीवर चौकशी करून दोषींवर कारवाई करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत वर्गखोली बांधकाम निविदा प्रक्रियेतील बनावट सही व गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांना म.जि.प.जि.से.(शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ नुसार दि.१३.०४.२०२६ रोजी निलंबित करण्यात आले आहे. सदरच्या कामाचे कोणत्याही प्रकारचे देयक अद्यापपर्यंत संबंधित कंत्राटदारास अदा करण्यात आलेले नसल्याने त्यामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात क्षयरोगाचा वाढता प्रादूर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(१३) * ३३३३३ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१ ) देशाला क्षयरोगमुक्त करण्यासाठी केंद्र शासनाने १०० दिवसांची विशेष मोहिम राबविली असता त्यामध्ये पहिल्या ३५ दिवसांतच राज्यात ६ हजार १११ नवे क्षयरोगी आढळून आले असून ११ हजार ९१ गावे

‘अतिजोखमीच्या’ (हाय रिस्क) म्हणून निवडली गेली असल्याचे माहे एप्रिल,२०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विशेष मोहिमेत विदर्भातील नागपूर (४८२), यवतमाळ (५३९), अमरावती (५०४) आणि नाशिक व रायगड (प्रत्येकी ४८८ गावे) रुग्णांची नोंद झाली असून या जिल्ह्यांमधील ११०० हून अधिक गावे तर लातूर जिल्ह्यातील २३३ गावे ‘अतिजोखमीच्या’ श्रेणीत असून माहे जानेवारी, २०२६ ते एप्रिल, २०२६ या चार महिन्यांच्या कालावधीत लातूर जिल्हयात ७५८ नवीन क्षयरुग्णांची नोंद झाली असून सध्या जिल्ह्यात एकूण १,८६९ रुग्णांवर उपचार सुरू आहेत तसेच अहिल्यानगर जिल्ह्यात क्षयरोगाची बाधा झालेल्या ९४०३ रुग्णांपैकी २४७ रुग्णांचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील कापूस उत्पादक पट्ट्यात आणि आदिवासी बहुल भागात असलेल्या गावांमध्ये कुपोषण आणि अस्वच्छतेमुळे क्षयरोगाचे प्रमाण इतर भागांच्या तुलनेत अधिक असून नागपूर विभागातील आरोग्य यंत्रणेने गेल्या ३५ दिवसांत हजारो संशयित रुग्णांची तपासणी केली असता मोठ्या संख्येने नवीन रुग्णांची नोंद ‘निक्षय’ (Ni-kshay) पोर्टलवर करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्षयरोगाच्या निदानासाठी आवश्यक असणारी ‘एआय’ (AI) आधारित अद्ययावत यंत्रणा आणि सीबी-नॅट (CB-NAAT) मशीनचा अनेक ठिकाणी अभाव असल्याने रुग्णांच्या उपचारास विलंब होत असून ‘अतिजोखमीच्या’ गावांमध्ये आरोग्य तपासणी पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ किंवा फिरत्या प्रयोगशाळांची (Mobile Labs) व्यवस्था केली नसल्याने ‘क्षयरोग मुक्त महाराष्ट्र’ मोहिमेची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार क्षयरोगाचा वाढता प्रसार रोखण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ, फिरत्या प्रयोगशाळा त्याचप्रमाणे औषधोपचार, संपर्क शोध मोहीम व जनजागृती तसेच उच्च जोखमीच्या गावांमध्ये विशेष आरोग्य पथके, तातडीच्या तपासण्या, उपचार सुविधा व पोषण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

“१०० दिवसीय टीबी मुक्त भारत अभियान” या विशेष अभियानांतर्गत विदर्भातील नागपूर (४८२), यवतमाळ (५३९), अमरावती (५०४) आणि नाशिक व रायगड (प्रत्येकी ४८८) या गावांची केंद्र शासनाकडून एआय (AI) प्रणाली द्वारे अतिजोखमीची गावे म्हणून नोंद झाली आहे. संबंधित जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत नियमितपणे क्षयरुग्ण शोध, निदान व उपचाराची कार्यवाही सुरू आहे.

लातूर जिल्ह्यात माहे जानेवारी ते एप्रिल, २०२६ या चार महिन्यांच्या कालावधीत जिल्हयात ७२९ नवीन क्षयरुग्णांची नोंद झाली असून सध्या जिल्हयात एकूण १०२० रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२५ मध्ये ४४९३ नवीन क्षयरुग्णांची नोंद झाली असून ९२ मृत्यूची नोंद झालेली आहे. तसेच, माहे जानेवारी ते मे, २०२६ या कालावधीत १८४६ नवीन क्षयरुग्णांची नोंद झाली असून १० मृत्यूची नोंद झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जोखीम आधारित तपासणी, सक्रिय क्षयरुग्ण शोध व निक्षय पोर्टलवर नोंदणीची कार्यवाही नियमितपणे करण्यात येते. विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात क्षयरोगाचे प्रमाण असामान्यरीत्या अधिक असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) हे खरे नाही.

राज्यात क्षयरोगाच्या निदानासाठी एआय (AI) आधारित ११७ हॅंडहेल्ड एक्सरे मशीन्स, १७१ सीबी-नॅट (CB NAAT) व ७४६ ट्रूनॅट (TrueNAAT) अशा एकूण ९१७ NAAT मशीन्स उपलब्ध आहेत.

जिल्हा स्तरावरून हाय रिस्क गावांमध्ये AI आधारित ११७ हॅंडहेल्ड एक्सरे मशीन्सचा वापर करून गावागावात जाऊन तपासणी करण्यात येत आहे. सेंट्रल टीबी डिव्हिजन कडील अतिरिक्त २२९ मशीन्स टप्प्याटप्प्याने वितरित करण्याची प्रक्रिया केंद्राकडून सुरू आहे.

(५) क्षयरोगाचा प्रसार रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१. क्षयरोगाच्या संशयित रुग्णांचे लवकर निदान करण्यासाठी सीबी-नॅट व ट्रुनॅट निदान सुविधांचा विस्तार करण्यात येत आहे.

२. जोखीम गट व गावांमध्ये विशेष तपासणी मोहिमा, सक्रिय रुग्ण शोध व संपर्क शोध (Contact Tracing) राबविण्यात येत आहे.

३. निदान झालेल्या सर्व रुग्णांना विनामूल्य व गुणवत्तापूर्ण औषधोपचार उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४. उपचारादरम्यान रुग्णांना पोषण सहाय्य योजनेअंतर्गत आर्थिक लाभ देण्यात येत आहे.

५. जनजागृतीसाठी विविध माध्यमांद्वारे माहिती, शिक्षण व संवाद (IEC) उपक्रम राबविण्यात येत आहे.

६. ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था व विविध विभागांच्या समन्वयातून "क्षयरोग मुक्त महाराष्ट्र" अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुलांमधील वाढता लठ्ठपणा रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(१४) * ३४९६९ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक आरोग्य बदलांच्या पार्श्वभूमीवर विकसित देशांप्रमाणेच भारतात व महाराष्ट्रातील मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचा इशारा 'युनिसेफ'ने माहे एप्रिल,२०२६ मध्ये दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बदललेली जीवनशैली, वाढता स्क्रीन टाइम, जंक फूडचे सेवन आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे मुलांमध्ये लठ्ठपणासह मधुमेह, हृदयविकार आणि उच्च रक्तदाब यांसारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण झाल्याने सार्वजनिक आरोग्यासमोरील आव्हाने वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागात कुपोषणाचा प्रश्न तर शहरी भागात लठ्ठपणाची समस्या गंभीर होत असल्याने आरोग्य नियमांचे उल्लंघन व मानवी संसाधनांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने लठ्ठपणावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्यातील शाळांमध्ये जंक फूडवर बंदी घालून शालेय पोषण आहार कार्यक्रमात आमूलाग्र बदल करून संतुलित व पौष्टिक आहाराबाबत धोरणात्मक सुधारणा तसेच जनजागृती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

UNICEF Child Nutrition Report २०२५ नुसार, जगभरातील ०५ ते १९ वर्षे वयोगटातील मुलांमधील लठ्ठपणाचे प्रमाण ९.४ टक्क्यांपर्यंत वाढले असून प्रथमच ते कमी वजनाच्या (underweight) प्रमाणापेक्षा (९.२ टक्के) अधिक झाले आहे.

(२) हे खरे आहे.

UNICEF, WHO तसेच Indian Academey of Pediatrics (IAP) यांच्या मते, अयोग्य आहार पध्दती, प्रक्रिया केलेल्या (processed) व ऊर्जा-समृध्द (energy-dense) खाद्यपदार्थांचे वाढते सेवन, अतिप्रमाणातील Screen time, बैठी जीवनशैली (sedentary behavior) आणि अपुरा शारीरिक व्यायाम ही बालक व किशोरवयीन मुलांमधील अधिक वजन व लठ्ठपणा वाढण्याची प्रमुख कारणे आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

NFHS-६ (२०२३-२४) नुसार महाराष्ट्रात पाच वर्षाखालील मुलांमध्ये कुपोषण अद्यापही चिंतेचा विषय असून २५.९ टक्के मुले Stunted, १६.६ टक्के Wasted आणि २८.९ टक्के underweight आहेत. NFHS-६ नुसार महाराष्ट्रातील शहरी भागात ४०.१ टक्के महिला आणि ४१.७ टक्के पुरूष यांचा BMI २५ kg/ml किंवा त्यापेक्षा अधिक आहे. तसेच ग्रामीण भागातही NFHS-५ ते NFHS-६ दरम्यान महिलांमध्ये हे प्रमाण १८.९ टक्क्यांवरून २४.८ टक्क्यांपर्यंत आणि पुरूषांमध्ये १९.३ टक्क्यांवरून २७.१ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.

(४) शालेय विद्यार्थ्यांमध्ये साखरयुक्त पदार्थांच्या अतिसेवनाने उद्भवणाऱ्या धोक्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्याकरीता, राज्यांनी आपल्या अखत्यारित असलेल्या सर्व शाळांना “शुगर बोर्ड/फलक” प्रदर्शित करण्याविषयी व चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित करण्याविषयी सूचित करावे, असे राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग, भारत सरकार यांनी कळविले असून त्यानुषंगाने शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात विविधता आणण्यासाठी प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना १२ प्रकारच्या पाककृतींच्या स्वरुपात पोषण आहाराचा लाभ देण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाव्दारे मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य महिला आयोगाला निधी उपलब्ध करून देणे सह बाह्य स्रोतांद्वारे भरलेली पदे कायम करण्याबाबत

**(१५) * ३३०२३ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महिला आयोगातील पदभरती, निधी वितरण तसेच बाह्य स्रोतांद्वारे भरलेली पदे कायम करण्याबाबत शासनाची सकारात्मक भूमिका आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर आयोगातील पदभरतीसंदर्भातील आकृतीबंध मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला असून त्यास मंजुरी देण्यात येईल, आयोगास उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीचे वितरण व खर्चाबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल तसेच या संदर्भात बैठक घेण्यात येईल असे आश्वासन मा. महिला व बालविकास राज्यमंत्री यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य महिला आयोगामध्ये नियमित पदभरती न झाल्यामुळे अनेक पदे बाह्य स्रोतांद्वारे भरावी लागत असल्याने त्याचा प्रतिकूल परिणाम आयोगाच्या कामकाजावर तसेच महिला तक्रार निवारण प्रक्रियेवर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आयोगाला अपुरा निधी उपलब्ध होत असल्याने महिला संरक्षण, जनजागृती, तक्रार निवारण तसेच विविध कल्याणकारी उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीत अडचणी निर्माण होत आहेत तसेच महिला आयोगाच्या कामकाजाचे पुनरावलोकन करण्यासाठी महिला आमदारांची समिती स्थापन करण्याबाबत शासनस्तरावर विचारविनिमय सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आयोगातील बाह्य स्रोतांद्वारे भरलेली पदे कायम करणे, नियमित पदभरती प्रक्रियेस गती देणेसह आयोगाला आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) महाराष्ट्र राज्य महिला आयोगास अर्थसंकल्पीत निधीमधून आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. तसेच, बाह्ययंत्रणेव्दारे भरलेली पदे कायम करण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.
(२) महिला व बाल विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांच्या सुधारित आकृतीबंधास दि.१०.०४.२०२६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये राज्य महिला आयोगाच्या पदांचाही समावेश आहे. आयोगास आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. तसेच, त्यांच्या अडचणींबाबत प्रशासकीय विभाग/ मा.मंत्री स्तरावर वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेण्यात येतो.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
महाराष्ट्र राज्य महिला आयोगास अर्थसंकल्पीत निधीमधून आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. तसेच, महिला आयोगाच्या कामकाजाचे पुनरावलोकन करण्यासाठी आमदारांची समिती स्थापन करण्याची बाब विचाराधीन नाही.
(५) बाह्ययंत्रणेवव्दारे भरलेली पदे कायम करण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही. सुधारित आकृतीबंधानुसार आयोगास मंजूर करण्यात आलेल्या पदांच्या पदभरतीबाबत आयोग सक्षम आहे.
(६ ) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरोग्य सुविधांची तूट भरून काढण्यासाठी रुग्णालये, उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढविणेबाबत

**(१६) * ३३२१५ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राजु तोडसाम (अर्णी), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोल्हापूर, पुणे, अमरावती, बुलढाणा आणि मुंबई येथे प्रत्येकी एक क्षयरोग रुग्णालय तर कोल्हापूर व पुणे जिल्ह्यात कुष्ठरोग रुग्णालय व पुणे, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये मनोरुग्णालय तसेच ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपूर येथे आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण आरोग्य आकडेवारीनुसार एकूण उपकेंद्रांची आवश्यकता १४२५५ असून उपलब्ध फक्त १०००० आहेत तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राची एकूण आवश्यकता २३२३ असून उपलब्ध १८५३ आहेत आणि

शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र ११६५ आवश्यक असताना उपलब्ध फक्त ५३८ आहेत तर जिल्हा रुग्णालये २३ आणि सामान्य रुग्णालय ८ आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि बदलते आजारांचे स्वरूप यामुळे सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांमध्ये तातडीने वाढ करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सार्वजनिक आरोग्य सुविधांची असलेली तूट भरून काढण्यासाठी जिल्हा रुग्णालय, क्षयरोग रुग्णालय, कुष्ठरोग रुग्णालय तसेच मनोरुग्णालय तसेच उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सन २०२४ च्या लोकसंख्येनुसार राज्यात साधारणपणे अपेक्षित व प्रत्यक्षात मंजूर प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र पुढीलप्रमाणे आहेत :-

| संस्थेचा प्रकार | अपेक्षित संस्था | प्रत्यक्षात संस्था | आवश्यक संस्था |
|---|---|---|---|
| प्राथमिक आरोग्य केंद्र | २५३५ | २१४४ | ३९१ |
| उपकेंद्र | १४०२३ | ११२८० | २७४३ |

जिल्हा रुग्णालये २३ आणि सामान्य रुग्णालय ८ आहेत.

याखेरीज नागरी भागात १९३५ आयुष्मान आरोग्य मंदिर नागरी उपकेंद्र, ८१७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ४४ नागरी रुग्णालय, २२२ पॉलिक्लिनिक आणि ६७६ हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब आपला दवाखाना या आरोग्य संस्था कार्यरत आहेत.

विकसित महाराष्ट्र २०४७ संकल्पनेनुसार राज्यात किमान ५ कि.मी. अंतरावर आरोग्य संस्थांच्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील तफावत कमी करण्यासाठी आरोग्य संस्थांचा बृहत आराखडा नव्याने करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथील मनोरुग्णालयाचे श्रेणीवर्धन (३२७८ खाटा) करण्यास तसेच जालना व कोल्हापूर येथे प्रत्येकी ३६५ खाटांचे नविन प्रादेशिक मनोरुग्णालय स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिलेली असुन मनोरुग्णालयाच्या इमारतींचे बांधकाम सुरु आहे.

राज्यात पाच क्षयरोग रुग्णालय व प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा क्षयरोग केंद्र व वैद्यकीय महाविद्यालय स्तरावर डी आर टी बी सेंटर कार्यरत आहेत.

कुष्ठ रुग्णांची तपासणी व उपचार ही सुविधा सर्व आरोग्य संस्था पातळीवर उपलब्ध असल्याने, कुष्ठ रुग्णांसाठी स्वतंत्र आरोग्य संस्थांची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंगणवाडी पर्यवेक्षक या पदासाठी वयाची मर्यादा शिथिल करण्याबाबत

**(१७) * ३८२०४ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंगणवाडी पर्यवेक्षक (मुख्य सेविका) या पदाच्या भरतीसाठी अंगणवाडी सेविकांकडे आवश्यक

शैक्षणिक पात्रता असूनही केवळ वयोमर्यादेच्या अटीमुळे त्या पर्यवेक्षक पदाच्या परीक्षेसाठी अपात्र ठरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत गेल्या काही वर्षांत अंगणवाडी सेविका संघटना आणि उमेदवारांकडून वयोमर्यादा किमान ४५ ते ५० वर्षांपर्यंत शिथिल करण्याबाबत निवेदने देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोना काळामुळे किंवा भरती प्रक्रियेतील विलंबामुळे ज्या उमेदवारांची वयोमर्यादा संपुष्टात आली आहे त्यांना विशेष सवलत देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंगणवाडी पर्यवेक्षक (मुख्य सेविका) या पदाच्या भरतीसाठी सध्या विहित केलेली कमाल वयोमर्यादा किती आहे,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अंगणवाडी सेविकांमधून पदोन्नतीसाठी घेतल्या जाणाऱ्या विभागीय स्पर्धा परीक्षेसाठी (Departmental Exam) वयोमर्यादेची अट पूर्णपणे काढून टाकणे किंवा त्यात ५ ते १० वर्षांची वाढ करण्याबाबत निर्णय घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) खरे नाही.
(४) महिला व बाल विभाग अधिसूचना दि.०४.०६.२०२१ नुसार मुख्यसेविका (पर्यवेक्षिका) या पदांचे सेवाप्रवेश नियम निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार अंगणवाडी सेविका मधून अंगणवाडी पर्यवेक्षिका (मुख्यसेविका) पदावर निवडीव्दारे पदोन्नती देताना त्यांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे असे सेवाप्रवेश नियमामध्ये नमूद करण्यात आले आहे.
(५) अंगणवाडी सेविका मधून निवडीव्दारे मुख्यसेविका (पर्यवेक्षिका) या पदावर पदोन्नती देताना वयाची ४५ वर्षाची अट रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अधिनस्त खंडपीठामध्ये अनेक रिट याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यापैकी काही याचिकांमध्ये मा.न्यायालयाचे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुषंगाने पुढील आवश्यक ती उचित कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याबाबत**

**(१८) * ३३५८८ श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.रवी राणा (बडनेरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कामगारांसाठी लोकसेवा हक्क हमी कायदा दिनांक १० नोव्हेंबर,२०२५ नुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने जालना जिल्ह्यासह राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी ३२ पेक्षा अधिक कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून सदर मंडळाच्या गैरव्यवस्थापनामुळे २० लाखाहून अधिक नोंदणीकृत कामगारांचे लाभ व अर्ज अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगार महिलांना स्वयंपाकासाठी लागणाऱ्या मूलभूत भांड्यांचा मोफत संच वाटप करण्याची योजना शासनामार्फत राबविण्यात येत असतानाही जालना जिल्ह्यात भांडी संच वाटप करण्यासाठी नेमण्यात आलेल्या खाजगी एजन्सीमार्फत कामगारांकडून प्रत्येकी रुपये ४०० व बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यासाठी रुपये १००० ते १५०० इतकी मागणी करण्यात येते तसेच मिळालेल्या आर्थिक लाभाच्या अर्धा लाभ दलालांना द्यावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील बांधकाम कामगार यांना विविध योजनेतील अर्थ साहाय्य तसेच (essential kit, safety kit, kitchen) अत्यावश्यक संचाचे वाटप गेल्या माहे फेब्रुवारी महिन्यापासून बंद असल्याने जिल्ह्यातील नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, त्यामुळे या योजनेचे वाटप विभागाकडून केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, सदरहू मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांसाठी कामगारांची नोंदणी करण्यासाठी कामगार विभागाने कायद्यात कोणतीही स्पष्ट तरतूद नसताना विधानसभानिहाय समित्या स्थापन करुन सदर समित्यांमार्फत मोठ्या प्रमाणात बनावट बांधकाम कामगारांची नोंदणी झाल्यामुळे मंडळाच्या निधीतून अनधिकृत लाभ वितरित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सद्य:स्थितीत नोंदणीकृत कामगारांना प्रामुख्याने वस्तुरूप लाभ (साहित्य, उपकरणे इत्यादी) दिले जात असून शैक्षणिक सहाय्य, मृत्यूनंतरचे लाभ व पेन्शन यांसारखे रोख/थेट लाभ नियमितपणे वितरित केले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(६) तसेच, जालना जिल्ह्यात दलालांमार्फत अनधिकृत संघटना किंवा संस्था चालविणे, योजनांचा गैरवापर करणे, बनावट कामगार नोंदणी करणे, लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली कामगारांकडून बेकायदेशीररित्या पैसे उकळणे यासह शासकीय लाभ उचलल्याचे अनेक प्रकार निदर्शनास येवूनही कामगार अधिकारी श्री.अमोल जाधव यांनी याबाबत कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अनधिकृत संस्था, जालना जिल्हा कामगार अधिकारी श्री.अमोल जाधव यांच्या निलंबनासह दलाल व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह कामगारांची आर्थिक लूट थांबविणे, भांडी संच वितरण प्रक्रिया पारदर्शक करणे, बनावट नोंदणीकृत कामगारांची छाननी करून त्यांना वगळणे, कामगार मंडळे व समित्यांचे पुनर्गठन करणे तसेच कामगारांना हक्कांचे संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप योजनेबाबतच्या २३ लोकसेवा, त्यांची नियत कालमर्यादा आणि पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी यांना शासनाच्या दिनांक ०४.०९.२०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये अधिसूचित करण्यात आले आहे.

मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण आणि विविध कल्याणकारी योजनेच्या लाभ वाटपाची कार्यवाही मंडळाच्या एकात्मिक कल्याणकारी मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS) या संगणकीय प्रणालीमार्फत करण्यात येते. सद्य:स्थितीत मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या वाढत्या नोंदणीसाठी कामगार आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना नोंदणी अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार देऊन कामकाज चालविले जाते. त्यामुळे कामकाजाचा आवाका पाहता, काही प्रमाणात अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बाबीच्या अनुषंगाने शासनस्तरावर मंडळासाठी सुधारित आकृतीबंध मंजूर करणे प्रस्तावित आहे.

(२) जालना जिल्हयात संच वाटप करणाऱ्या एजन्सीकडून संच वाटपासाठी कामगारांकडून पैसे घेत असल्याच्या तक्रारी क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाल्याने संबंधितांवर पोलीस स्टेशन, परतूर येथे प्रथम खबरी अहवाल (FIR) क्र.०१८२/२०२६, दिनांक २४.०४.२०२६ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्हयात गृहपयोगी वस्तु संच, सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप प्रत्येक वितरण केंद्रावर प्रति दिन संच वितरण क्षमता जास्तीत जास्त ५०० (प्रती दिन) संच वाटप करण्यास मंडळस्तरावरुन यापूर्वीच कळविण्यात आले आहे.

(४) हे खरे नाही.

बांधकाम कामगारांनी मंडळाकडे नोंदणी, नुतनीकरण व लाभ मिळणेकरिता अर्ज सादर केल्यावर तालुका बांधकाम कामगार सुविधा केंद्रामार्फत मुळ कागदपत्रांची तपासणी होऊन संबंधित कामगाराचे बोटांचे ठसे (बायोमॅट्रीक) व फोटो घेतल्यानंतर नोंदणी अधिकाऱ्यामार्फत अर्ज मंजूर करण्यात येतात. मंडळ कामकाजात सुसुत्रता व पारदर्शकता यावी तसेच नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप प्रक्रिया लोकाभिमुख व्हावी याकरिता दि.०९.०९.२०२५ व दि.०४.११.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थानिक विधानसभा सदस्यांच्या अध्यक्षतेखाली "स्थानिक संनियंत्रण समिती" गठीत करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने एकूण १०५ स्थानिक संनियंत्रण समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. परंतु मा.उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.७५०/२०२६ मध्ये मा.न्यायालयाने दि.३०.०४.२०२६ रोजी दिलेल्या आदेशात उक्त शासन निर्णयाला स्थगिती दिली असून प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५), (६) व (७) हे खरे नाही.

मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजना आणि बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण व बँक खाती इ.बाबत प्राप्त तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हा स्तरावर दक्षता पथक स्थापन करण्याच्या सूचना मंडळामार्फत दि.२५.०६.२०२५ रोजी देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन राज्यात सर्व विभागात दक्षता पथकांची स्थापना करण्यात आली असून या पथकाच्या माध्यमातून राज्यातील विविध ठिकाणी बेकायदेशीर संघटना, दलाल व बोगस कामगार यांचेविरुद्ध संबंधित पोलीस ठाण्यात प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल केले आहेत.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य महिला आयोगाकडे असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलद गतीने करण्याबाबत

**(१९) * ३२८८५ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२५ मध्ये बालकांशी संबंधित गुन्हे २५,००० पेक्षा अधिक दाखल झाले असून महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे सध्या सुमारे १,६०० प्रकरणे सुनावणीसाठी प्रलंबित असून या गुन्ह्यांमध्ये प्रामुख्याने अपहरण, लैंगिक अत्याचार, बालमजुरी आणि मानवी तस्करी यांसारख्या गंभीर प्रकरणांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्य महिला आयोगाकडे दिनांक १ एप्रिल, २०२५ ते माहे फेब्रुवारी, २०२६ या दहा महिन्यांच्या कालावधीत महिला अत्याचाराच्या १६,६०८ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी २,७७७ तक्रारी अजूनही प्रलंबित आहेत तसेच बलात्काराच्या ४,४९७ घटनांची नोंद झाली असून ४८ तासांत किंवा विहित मुदतीत न्याय न मिळाल्याने ७३३ तक्रारी अद्यापही निकाली निघाल्या नसल्याचे व कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या १७६ तक्रारी दाखल झाल्या असल्याचे माहे एप्रिल,२०२६ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती पोलीस अधीक्षकांच्या कार्यक्षेत्रातील आयटी (IT) क्षेत्रातील महिला कर्मचारी आणि नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील लैंगिक शोषण प्रकरणासंदर्भात महिला आयोगाने मागिवलेल्या विशेष अहवालावर गृह विभाग आणि प्रशासनाने कारवाई केली आहे काय,

(४) राज्य महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षांच्या कार्यकाळात तक्रारींचे प्रमाण झपाट्याने वाढले असून प्रशासकीय दिरंगाईमुळे पीडित महिलांना न्याय मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५ ) असल्यास, वाढत्या बाल गुन्हेगारीला रोखण्यासाठी व प्रलंबित प्रकरणांचा जलद गतीने निपटारा व्हावा म्हणून ‘समर्थन’ या सेवाभावी संस्थेने शासनानकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य महिला आयोगाकडे असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलद गतीने करण्यासाठी निश्चित वेळापत्रक तयार करणे तसेच पोलीस आयुक्तालय तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांत ‘विशेष बाल पोलीस पथक कक्ष’ स्थापन करणे आणि ‘पोक्सो’ (POCSO) न्यायालयांची संख्या वाढविणे तसेच महिला आयोगाची यंत्रणा अधिक सक्षम करणेसह आरोपींना कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**कुमारी आदिती तटकरे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे दिनांक १ एप्रिल, २०२५ ते माहे फेब्रुवारी, २०२६ या दहा महिन्यांच्या कालावधीत महिला अत्याचाराच्या १६६०८ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी २७७७ तक्रारींवरील अंतिम अहवाल प्राप्त न झाल्याने कार्यवाहीस्तव आहेत.

तसेच, प्रश्नात नमूद ४४९७ ही संख्या फक्त बलात्काराच्या तक्रारींच्या नोंदी नसून सामाजिक समस्या या वर्गीकरणातील आहेत. त्यामध्ये हुंडा प्रथा, लैंगिक असमानता, जातीभेद, बलात्कार, सायबर गुन्हे, लिंगाधारित हिंसाचार, अंधश्रध्दा इत्यादी तक्रारींचा समावेश होतो. या वर्गीकरणातील तक्रारींपैकी ३७६४ तक्रारींवर कार्यवाही पूर्ण झाली आहे व ७३३ तक्रारींवर अंतिम अहवाल प्राप्त न झाल्याने कार्यवाहीस्तव आहेत. सद्य:स्थितीत माहे एप्रिल, २०२६ अखेर पर्यंत सामाजिक समस्यांच्या ६०७ तक्रारींवर कार्यवाही सुरु आहे.

(३) अमरावती येथील प्रकरणी राज्य महिला आयोगाकडून पोलीस अधिक्षक, अमरावती यांना पत्र पाठविण्यात आले आहे. नाशिक येथील प्रकरणी पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी दि. १६/०६/२०२६ रोजी अहवाल राज्य महिला आयोगास सादर केला आहे.

(४) महिला आयोगाच्या विविध उपक्रमांमुळे महिलांमध्ये अन्यायाविरुध्द दाद मागण्याची जाणीव निर्माण झाल्याने

महिलांच्या तक्रारीमध्ये वाढ झाली आहे.
(५) हे खरे नाही.
(६) शासन निर्णय, दि. १० एप्रिल २०२६ अन्वये विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता दिली असून महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य महिला आयोग यांची यंत्रणा सक्षम करण्यासाठी मनुष्यबळ वाढविण्यात आलेले आहे.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महिला सुरक्षा अभियान (National Mission for Safety of women) अंतर्गत राज्यातील बलात्कार व 'पोक्सो' कायद्याअंतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी १३८ जलद गती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये व जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालये यांना 'विशेष बाल पोलीस पथक कक्ष' स्थापन करण्याबाबत दि. १७/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

-----------------

## मौजे फुगाळे (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायती अंतर्गत वरसवाडी क्षेत्रात पक्का रस्ता बांधणेबाबत

**(२०) * ३२७१८ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे फुगाळे (ता.शहापूर, जि.ठाणे) ग्रामपंचायती अंतर्गत वरसवाडी क्षेत्रात श्रीमती मंदा श्रवण आघाण या महिलेची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यांना बेशुध्द अवस्थेत पक्का रस्ता नसल्यामुळे रुग्णावाहिका ऐवजी डोलीतून (चादरीच्या झोळीतून) खडतर मार्गाने (पाऊलवाटाद्वारे) सुमारे ३ कि.मी. अंतरावर असलेल्या इगतपुरी येथील खाजगी रुग्णालयात दाखल केल्याची घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे पक्का रस्ता नसल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत आजारी व गंभीर रुग्णांना शहापूर किंवा इगतपूरी या ठिकाणी जाताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून वेळेस उपचार न मिळाल्यामुळे बाळंतीण महिला व तिचे बाळ दगावल्याच्या घटना घडल्याचे निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नुषंगाने स्थानिक नागरिकांनी तसेच गावातील श्रमजीवी संघटनेने पक्का रस्ता तात्काळ बांधून देण्याच्या दृष्टीने १.जिल्हाधिकारी, ठाणे २.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (बांधकाम), ठाणे ३.कार्यकारी अभियंता, सा.बा विभाग क्रमांक-१, ठाणे (पश्चिम) ४.उप अभियंता, सा.बां. उपविभाग, शहापूर क्रमांक-१ यांचेकडे प्रत्यक्ष भेटून निवेदने सादर करुनही, अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने रस्त्यांची कामे न करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह वरसवाडी क्षेत्रात तात्काळ पक्का रस्ता बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) वरसवाडी हा आदिवासी पाडा ता.शहापूर, जि.ठाणे मधील फुगाळे ग्रामपंचायतीमध्ये स्थित आहे. वरसवाडी हा आदिवासी पाडा शहापूर तालुक्यातील प्रजिमा ५४ वरील आघणवाडी या गावापासून २ किमी अंतरावर आहे. आघणवाडी ते वरसवाडी पाडा रस्ता हा अवर्गीकृत रस्ता असून सदर रस्त्याची लांबीची जागा ही वन क्षेत्रात येते.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडून ठाणे जिल्हयातील आदिवासी वाडे-पाडे जोडणारे अवर्गीकृत रस्त्याच्या संदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या संदर्भात दि.१०.०६.२०२६ रोजीच्या शासन पत्रान्वये, विहीत कार्यपध्दती अवलंबून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील आरोग्य तपासणी प्रक्रियेत पारदर्शकता आणणेबाबत**

**(२१) * ३६७६८ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकलूज (जि.सोलापूर) येथील उपजिल्हा रुग्णालयाशी संलग्न शासकीय ‘आयसीटीसी’ (ICTC) केंद्राने एका सात महिन्यांच्या गर्भवती महिलेला ‘एचआयव्ही’ पॉझिटिव्ह असल्याचा चुकीचा अहवाल दिल्याची घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या चुकीच्या अहवालामुळे संबंधित महिलेला पंढरपूर येथील एआरटी (ART) सेंटरमध्ये अनावश्यक औषधोपचार घ्यावे लागले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर खोट्या अहवालामुळे पीडित महिलेला तिच्या सासरच्या मंडळींनी घराबाहेर काढल्याने तिचे सामाजिक व कौटुंबिक आरोग्य धोक्यात आले असून प्रशासकीय हलगर्जीपणामुळे पीडित महिलेने आत्मदहनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करणेसह भविष्यात अशा चुका टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) सदर घटना ही माहे ऑगस्ट २०२४ मध्ये घडली असून याबाबत महाराष्ट्र राज्य एडस नियंत्रण संस्था कार्यालयास दि. २७.०२.२०२६ रोजी तक्रार प्राप्त झाल्याने चौकशी अंती बाब निर्दशनास आली.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) याबाबत उपसंचालक, पुणे यांच्या स्तरावर चौकशी समिती नेमून त्यांच्या अंतिम अहवालानुसार संबंधित प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांच्या कामामध्ये झालेल्या हलगर्जीपणामुळे त्यांची सेवा कायमस्वरुपी समाप्त करण्यात आलेली आहे. तसेच अकलूज येथील आयसीटीसी समुपदेशक यांना शास्ती म्हणून त्यांना धाराशिव येथील आयसीटीसी

केंद्रामधील रिक्त पदी नियुक्ती देऊन त्यांना त्यांच्या मूळ वेतनावर आणण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणाशी निगडीत डॉ. महेश गुडे, तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, अकलूज व डॉ. शर्वरी नेरे, वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, अकलूज सोलापूर यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

तसेच सर्व आयसीटीसी समूपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचे कार्यक्रमाविषयी आकलनक्षमता व सखोल ज्ञान वाढविण्यासाठी वार्षिक प्रशिक्षण आयोजन करण्यात येत आहे. तसेच याबाबत चुका न होण्यासाठी जिल्हास्तरीय नोडल ऑफिसर (संपर्क अधिकारी) नेमून सर्व कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात रस्ते अपघातग्रस्तांसाठी "पीएम-राहत" योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसह कॅशलेस उपचार सुविधा देणेबाबत**

**(२२) * ३२३६० श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते अपघातात जखमी झालेल्या नागरिकांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी "पीएम-राहत" योजनेतंर्गत रुपये दीड लाख इतक्या रकमेपर्यंत कॅशलेस उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघातानंतर गोल्डन अवर मध्ये उपचार मिळावेत यासाठी या योजनेंतर्गत २४ तासांच्या आत रुग्णालयात दाखल झालेल्या अपघातग्रस्तांना ७ दिवसांपर्यंत मोफत उपचार देण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी सर्व शासकीय व खाजगी (डिझिग्नेटेड व नॉन-डिझिग्नेटेड) रुग्णालयांमध्ये होत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रस्ते अपघातात जखमी झालेल्या अपघातग्रस्तांना तातडीने व विनामूल्य उपचार मिळण्यासाठी "पीएम-राहत" योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर योजना भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली असून राज्यामध्ये सदर योजनेची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी राज्यस्तरावर आयुक्त, परिवहन यांचा अध्यक्षेखाली "राज्य रस्ते सुरक्षा परिषद" कार्यरत आहे. तसेच, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा रस्ते सुरक्षा समिती" ही यंत्रणा कार्यरत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जावदा (ता.शहादा, जि.नंदुरबार) येथील अंगणवाडी मध्ये देण्यात येणाऱ्या पोषण आहारात अळया आढळल्याबाबत

**(२३) * ३४८३५ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जावदा (ता.शहादा,जि.नंदुरबार) येथील अंगणवाडी मधील लहान मुलांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारातील मिलेट बारमध्ये अळया आढळल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकार लहान मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक असल्याने याबाबत संबंधितांकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यास जबाबदार असण्याऱ्या संबंधितांवर कारवाई करणेसह भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, माहे एप्रिल २०२६ मध्ये नंदुरबार जिल्ह्यातील म्हसावद प्रकल्पांतर्गत येणाऱ्या जावदे त.ह. क्र. ०३ (बीट वाघडे, ता. शहादा) येथील अंगणवाडी केंद्रात बालकांना देण्यात आलेल्या मिलेट न्यूट्रिटीव्ह बारमध्ये अळया आढळल्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीची त्वरित दखल घेऊन बाल विकास प्रकल्प अधिकारी, म्हसावद आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती शहादा यांनी दिनांक २०/०४/२०२६ रोजी संबंधित अंगणवाडी केंद्राला तक्रारदार पालक, सदर गावचे सरपंच व गावातील इतर नागरिक यांचे समक्ष प्रत्यक्ष भेट दिली. या प्रसंगी अंगणवाडी स्तरावरील शिल्लक न्यूट्रिटीव्ह बारचे २ ते ३ पाकिटे फोडून पाहिली असता त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या अळया व किडे आढळून आलेले नाहीत.

तसेच वस्तुस्थितीची खात्री करण्यासाठी तक्रारदार पालक यांचेकडून मिलेट बारचा नमुना ताब्यात घेऊन, तसेच अंगणवाडीतील इतर सीलबंद पाकिटे एकत्रित करून मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासणीकरीता दिनांक २१/०४/२०२६ रोजी पाठविण्यात आले. त्यानुसार त्यामध्ये सदरचा आहार खाण्यास योग्य असल्याबाबत प्रयोगशाळेकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामुळे अंगणवाडीत पुरवठा करण्यात आलेला मिलेट आहार दर्जेदार आणि बालकांच्या आरोग्यासाठी सुरक्षित असल्याचे स्पष्ट होत आहे.

त्याचप्रमाणे अंगणवाडी केंद्रातील बालकांची दिनांक २०/०४/२०२६ रोजी आरोग्य तपासणी करण्यात आली असून, त्यामध्ये कोणत्याही बालकास आरोग्याच्या समस्या आढळून आलेल्या नाहीत. तथापि, खबरदारीचा उपाय म्हणून असे प्रकार भविष्यात घडू नये याकरीता संबंधित यंत्रणेला सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कुपोषणाचे पूर्णत: निर्मूलन करणेसाठी प्रभावी उपाययोजना करणेबाबत**

**(२४) * ३२८९३ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढते कुपोषणाचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी शासनाकडून अनेक उपाययोजना करुनही मागील तीन वर्षांत तब्बल ३४ हजार ३५२ बालकांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही महिन्यांपासून आदिवासी भागातील फिरती पथकेही बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील विविध भागात महिला व बालविकास विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार ४१ तीव्र कुपोषित व ३३० सौम्य कुपोषित अशी एकूण ३७१ बालके कुपोषित असल्याचेही माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुपोषणाचे प्रमाण आटोक्यात आणण्याबाबत शासन अपयशी ठरत असल्याचे ताशेरे काही महिन्यांपूर्वी मा.उच्च न्यायालयाने ओढले असता दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी पर्यंत सर्वंकष आदिवासी योजना आणल्या जातील असे प्रतिज्ञापत्र शासनाने मा.मुंबई उच्च न्यायालयाला दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील कुपोषण पुर्णत: निर्मूलन करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करुन त्याची ठोस अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडी सेविकांमार्फत दरमहा बालकांची वजन व उंची मोजली जाते. या माहितीची नोंद केंद्र शासनाने विकसित केलेल्या 'पोषण ट्रॅकर' प्रणालीमध्ये करण्यात येते. त्याआधारे सदर प्रणालीद्वारे बालकांची सामान्य, मध्यम कुपोषित, तीव्र कुपोषित अशी श्रेणी निश्चित केली जाते. पोषण ट्रॅकरवरील माहितीनुसार राज्याची मागील ३ वर्षातील कुपोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| कालावधी | वजन व उंची घेतलेल्या बालकांची संख्या | तीव्र कुपोषित बालके (SAM) | % | मध्यम कुपोषित बालके (MAM) | % |
|---|---|---|---|---|---|
| मार्च, २०२४ | ४२६२६५२ | ५१४७५ | १.२१ | १६६९९८ | ३.९२ |
| मार्च, २०२५ | ४८१०३०२ | २९१०७ | ०.६१ | १४९६१७ | ३.११ |
| मार्च, २०२६ | ४४३८०४८ | १३३२१ | ०.३० | ९३२८० | २.१० |

उपरोक्त माहितीनुसार राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते. तसेच, आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यात सन २०२३-२४ मध्ये १३८१०, सन २०२४-२५ मध्ये १३७२८ आणि सन २०२५-२६ मध्ये १३०२१ असे गेल्या तीन वर्षांत एकूण ४०,५५९ बालमृत्यू झाले आहेत. आरोग्य विभागाने कळविल्यानुसार सदर बालमृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून; प्रामुख्याने मुदतपूर्व जन्म (Premature birth), जंतुसंसर्ग (Infection), रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम (Respiratory Distress Syndrome), जन्मतः श्वासावरोध (Birth Asphyxia), जन्मतः व्यंग (Congenital Anomalies) आणि न्यूमोनिया (Pneumonia) या वैद्यकीय कारणांमुळे झाले आहेत.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रामधील लाभार्थ्यांना सेवा विहित मुदतीत व योग्य प्रकारे मिळण्याच्या अनुषंगाने सनियंत्रण व पर्यवेक्षण करण्यासाठी संबंधित क्षेत्रातील जिल्हा कार्यक्रम अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच पर्यवेक्षिका यांच्यामार्फत नियमित क्षेत्रभेटी दिल्या जात आहेत. तसेच, गरजेनुसार आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांसमवेत बालकांची आरोग्य तपासणी व गरोदर महिलांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी अंगणवाडी केंद्रांना संयुक्त भेटी देऊन बालकांचे Joint Screening देखील करण्यात येत आहे.

(३) पोषण ट्रॅकर वरील माहितीनुसार रायगड जिल्ह्याची मागील तीन वर्षाची कुपोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| कालावधी | वजन व उंची घेतलेल्या बालकांची संख्या | तीव्र कुपोषित बालके (SAM) | % | मध्यम कुपोषित बालके (MAM) | % |
|---|---|---|---|---|---|
| मार्च, २०२४ | ११२९३८ | ७१४ | ०.६३ | २६७६ | २.३७ |
| मार्च, २०२५ | १०४०१२ | ३८० | ०.३७ | २१४५ | २.०६ |
| मार्च, २०२६ | ९१३६८ | १५६ | ०.१७ | ८८६ | ०.९७ |

उपरोक्त माहितीनुसार रायगड जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राज्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये नियमित दिल्या जाणाऱ्या सेवांव्यतिरिक्त ‘ भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना’ राबवली जाते. या योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा माता यांना एक वेळचा पूर्ण चौरस आहार दिला जातो. तसेच, ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील शाकाहारी बालकांना केळी आणि इतर बालकांना अंडी दिली जातात. तसेच, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रांमध्ये ज्या योजना राबविल्या जातात याबाबत PIL १३३/२००७ च्या अनुषंगाने वेळोवेळी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

(५) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कुपोषण कमी करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतात:-

१) पूरक पोषण आहार:- ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, तसेच गरोदर महिला आणि स्तनदा मातांना ‘टेक होम रेशन’ (THR) तर ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंगणवाडी केंद्रांवर गरम ताजा आहार पुरवला जातो.

२) भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना:- या योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रातील गरोदर महिला आणि स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार दिला जातो. तसेच, ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार दिवस अंडी/केळी देण्यात येतात. त्यामध्ये शाकाहारी बालकांना दररोज २ केळी आणि मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३) सॅम (SAM) बालकांसाठी विशेष उपक्रम:- राज्यातील अति तीव्र कुपोषित (SAM) बालकांसाठी

ग्राम/नागरी बाल विकास केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांमध्ये सॅम बालकांना दिवसातून तीन वेळा "एनर्जी डेन्स न्यूट्रिशिअस फूड" पुरवले जाते व आवश्यकतेनुसार आरोग्य विभागामार्फत त्यांना औषधोपचारही दिले जातात.

४) पोषण अभियान आणि जनजागृती:- पोषण अभियानअंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालके, किशोरवयीन मुली आणि महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरांवर निरंतर शिक्षण वृद्धी दृष्टिकोन (ILA), समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाइम मॉनिटरिंग (ICT-RTM) आणि जनआंदोलन असे उपक्रम राबवले जात आहेत.

५) 'बाळाचे पहिले सुवर्णमयी १००० दिवस' अभियान:- राज्यातील नागरी व ग्रामीण भागातील कुपोषण कमी करण्यासाठी बाळाच्या आयुष्यातील "पहिले सुवर्णमयी १००० दिवस" या महत्त्वाच्या टप्प्याविषयी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण मोहिम जलद गतीने पूर्ण करणेबाबत**

**(२५) * ३६८१३ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिलांमध्ये आढळणाऱ्या गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे म्हणून राज्यात दिनांक ८ मार्च, २०२६ पासून १४ वर्ष वय पूर्ण झालेल्या परंतु १५ वर्ष वय पूर्ण न झालेल्या मुलींसाठी ९० दिवसांची विशेष एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत असल्याचे माहे मे,२०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर मोहीम अत्यंत संथ गतीने सुरू असून ८,६४,४१४ मुलींचे लसीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असताना दिनांक ५ मे, २०२६ पर्यंत केवळ ४३,९३२ मुलींचे म्हणजे एकूण उद्दिष्टाच्या केवळ ५.०८% मुलींचे लसीकरण पूर्ण झाले असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर एचपीव्ही लसीकरण मोहीम संथ गतीने राबविण्यात येत असण्यामागची कारणे काय आहेत ,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर मोहिमेचा कार्यकाल वाढवून मोहीम जलद गतीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

१४ वर्ष वय पूर्ण झालेल्या परंतु १५ वर्ष वय पूर्ण न झालेल्या राज्यातील ९,८४,४१४ मुलींना एचपीव्ही लस देण्याचे उदिष्ट असून U-WIN पोर्टलवरील अहवालानुसार दि.५ मे, २०२६ पर्यंत राज्यातील ४३,८८६ पात्र मुलींना (४.४६%) एचपीव्ही लस देण्यात आली होती. तथापि, U-WIN पोर्टलवरील अहवालानुसार दि.१३ जून, २०२६ पर्यंत ६३,७१८ पात्र मुलींना (६.४७%) एचपीव्ही लस देण्यात आली आहे.

(३) सदर मोहिम संथ गतीने राबविण्यात येत नसून प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यावरील संस्थामध्ये नियमित लसीकरण सत्रे आयोजित करण्यात येतात.परंतु मोहिमेस मिळणारा पालकांचा प्रतिसाद कमी आहे.

• विविध समाजिक माध्यमांवर सोशियल इन्फ्लुएन्सर द्वारे एचपीव्ही लसीकरणाबाबत सुरुवातीच्या काळात

नकारात्मक संदेश प्रसारित करण्यात आले होते त्यामुळे सदर लसीकरणासाठी पालकांची संमती बंधनकारक असल्यामुळे पालकांच्या मनात एचपीव्ही लसींबद्दल संशय बळावला होता.

• मोहिमेच्या काळात शालेय विद्यार्थ्यांच्या वार्षिक परिक्षा असल्यामुळे त्याकाळात लसींमुळे दुष्परिणाम होवून परिक्षेत अडचण येईल या शंकेमुळे पालकांनी आपल्या मुलींना एचपीव्ही लस देण्यासाठी प्रतिसाद दिलेला नव्हता.

(४) शासनाकडून एचपीव्ही लसीकरण मोहिमेतील लसीकरणाचे काम वाढविण्याकरीता पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत,

• केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा कालावधी पुढील तीन महिन्याकरिता वाढविण्यात आलेला आहे.

• जिल्हा/मनपास्तरावर एचपीव्ही लसीकरण मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व आयुक्त, मनपा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा/मनपा कृती दलाच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत व शासनाच्या सर्व संबंधीत विभागांना या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविण्याबाबत अवगत केले आहे.

• शाळांमध्ये पालक शिक्षक सभाचे आयोजन करुन एचपीव्ही लसीकरणाबाबत पालकांमध्ये सकारात्मक जनजागृती करण्यात येत आहे.

• एचपीव्ही लसीकरणावावत सामाजिक माध्यमांव्दारे, पोस्टर, बॅनरव्दारे सकारात्मक संदेश प्रसारित करुन जनजागृती करण्यात येत आहे.

• तसेच एचपीव्ही लस घेतलेल्या मुलींचे सकारात्मक व्हीडीओ विविध माध्यमांव्दारे प्रसारित करुन जनजागृती करण्यात येत आहे.

• आशा स्वयंसेविका यांचेमार्फत पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून एचपीव्ही लसीकरणाचे महत्व पटवून देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नीट-यूजी २०२६ परीक्षा पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान

**(२६) * ३३८१४ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून पेपरफुटी व अनियमिततेच्या संशयावरून (एनटीए) नीट-यूजी २०२६ परीक्षा रद्द करण्यात आल्याने देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचे माहे मे, २०२६ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, नीट-यूजी, २०२६ परिक्षेत जीवशास्त्र (बायोलॉजी), रसायनशास्त्र (केमिस्ट्री) आणि भौतिकशास्त्राचे प्रश्न एका संशयास्पद ''गेस पेपर''शी तंतोतंत जुळत असल्याचा दावा केला जात असून या प्रश्नांमधील आकडे, शब्दरचना आणि कॉमा, फुलस्टॉप देखील जसेच्या तसेच असल्याचे निदर्शनास आले असून सदर गैरप्रकार हा

खासगी संस्था अथवा शिकवणी वर्गांच्या संगनमतातून घडला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परीक्षा पेपरफुटी प्रकरणात शिक्षक, कोचिंग नेटवर्क, दलाल किंवा अधिकाऱ्यांचा सहभाग तसेच आर्थिक व्यवहार, मोबाईल संपर्क, डिजिटल पुरावे आणि बाहेरील राज्यांशी संबंधित नेटवर्कच्या तपासात महाराष्ट्राशी संबंधित बाबी समोर आल्या असून सदर प्रकरणी नाशिक येथील इंदिरानगर परिसरातून कु.'शुभम खैरनार' नावाच्या विद्यार्थ्याला कथित आर्थिक गैरव्यवहार व पेपरफुटी प्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील काही वर्षांपासून होत असलेल्या या पेपर फुटीबाबत परीक्षा प्रक्रियेच्या यंत्रणेवर संशय निर्माण झाले असून विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत असल्याने सदर परीक्षा ही थेट एआयआयएमएस (एम्स) मार्फत घेण्याची मागणी विद्यार्थी व नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत सखोल चौकशी करुन यात दोषी आढळलेल्या संबंधितांवर फौजदारी कारवाई, सेवा समाप्ती, संपत्ती जप्ती तसेच बँक खाती गोठविणे इत्यादी सारखी कारवाई करणेसह विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये तसेच भविष्यात अशा गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासन, National Testing Agency (एनटीए) व संबंधित तपास यंत्रणांशी समन्वय साधून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे व "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा प्रतिबंधक कायदा २०२४' ची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील वैद्यकीय प्रवेशासाठी नीट युजी २०२६ परीक्षा दिनांक ०३.०५.२०२६ रोजी नॅशनल टेस्टिंग एजन्सी, नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात आली होती. त्यानंतर पेपरफुटी व अनियमिततेच्या संशयावरुन सदर परीक्षा रद्द करण्यात आल्याचे व दिनांक २१.०६.२०२६ रोजी पुनर्परीक्षा घेण्यात येणार असल्याचे एन.टी.ए. मार्फत जाहीर करण्यात आलेले आहे.

(२) नीट युजी २०२६ च्या परीक्षेत जीवशास्त्र (बायोलॉजी), रसायनशास्त्र (केमिस्ट्री) आणि भौतिकशास्त्राचे प्रश्न एका संशयास्पद गेस पेपरशी तंतोतंत जुळत असल्याच्या प्रकरणामध्ये केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सी.बी.आय.), नवी दिल्ली येथे गुन्हा क्र.RC २२१२०२६ E०००१०, CBI, EO-III असा गुन्हा दाखल आहे.

(३) क्राईम ब्रांच युनिटच्या पथकाने संशयीत शुभम खैरनार यास नाशिक शहराच्या इंदिरानगर परिसरातून ताब्यात घेऊन केंद्रिय गुन्हे अन्वेषण विभाग (CBI), मुंबई यांचेकडे पुढील कारवाईकामी सुपूर्द करण्यात आले आहे.

(४) नीट युजी परीक्षा आयोजित करण्याबाबतचा विषय हा केंद्र शासन व नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) यांचे कार्यकक्षेतील आहे.

(५) नीट-युजी २०२६ परीक्षा प्रकरणामध्ये सी.बी.आय., नवी दिल्ली येथे गुन्हा नोंद क्र.RC २२१२०२६ E०००१०, CBI, EO-III असा गुन्हा दाखल झाला असून नमूद गुन्ह्याचा तपास केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सी.बी.आय.), नवी दिल्ली हे करीत आहेत.

तसेच, "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) अधिनियम, २०२४' हा राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाने घेतलेल्या परीक्षेसाठी लागू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील "अमुदान केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड" या कारखान्यात झालेला स्फोट**

**(२७) * ३५१०० श्री.राजेश मोरे (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील औद्योगिक वसाहतीतील "अमुदान केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड" या कारखान्यात दिनांक २३ मे, २०२४ रोजी वा त्यादरम्यान रिॲक्टरमध्ये तापमान व दाब वाढल्याने भीषण स्फोट होऊन १३ कामगारांचा मृत्यू व ६७ व्यक्ती जखमी झाल्या तसेच आजूबाजूच्या २ ते ३ किलोमीटर परिसरातील राहत्या घरांचे व औद्योगिक आस्थापनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेनंतर महसूल विभागामार्फत बाधित मालमत्तांचे पंचनामे करण्यात आले असून मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रु.५ लाख इतके रुपये देण्याची तरतूद करण्यात आली आहे, मात्र बाधित मालमत्ताधारकांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक प्रकल्पग्रस्त नागरिकांना त्यांच्या घरांचे व व्यावसायिक मालमत्तांचे झालेले नुकसान लक्षात घेता तातडीने नुकसान भरपाई मंजूर करण्याबाबत मागणी करण्यात आली असूनही सदर निधी वितरित झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदरहू बाधित मालमत्ताधारकांना तातडीने नुकसानभरपाई मंजूर करून वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदर स्फोटाच्या घटनेत एकूण १३ कामगार मृत झाले होते. सदर अपघातग्रस्त १३ मृत कामगारांच्या वारसांना शासनातर्फे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी रु.५ लाख यानुसार एकूण रु.६५ लाख इतके अर्थसहाय्य मंजूर झाले होते व यातील १३ मृत व्यक्तीपैकी १२ मृत व्यक्तींच्या वारसांना तहसिलदार, कल्याण या कार्यालयामार्फत धनादेशव्दारे प्रत्येकी रु.५ लाख मदत देण्यात आलेली आहे. उर्वरित १ मृत व्यक्तीच्या वारसाचे पुरावे तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर घटनेच्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिका व महसुल यंत्रणेतर्फे संयुक्तरित्या घटना स्थळाचा तसेच त्या बाजुच्या परीसरातील रहिवाशी व वाणिज्य अशा एकूण ९८० मालमत्तांचा पंचनामा करण्यात आला होता. यापैकी ६४३ मालमत्ता या रहिवाशी असून ३३७ मालमत्ता या वाणिज्य आहेत. वाणिज्य मालमत्तेचे एकूण रु.१३,९०,७३,४१८/- नुकसान झाले आहे. तसेच १५ औद्योगिक आस्थापनांचे एकत्रित एकूण रु.२२,१८,२२,०००/- नुकसान झाले होते.

(३) व (४) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून घरांचे व व्यावसायिक मालमत्तांच्या झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य मिळण्यासाठी प्रस्ताव मुख्यमंत्री सचिवालयास प्राप्त झालेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेर्डी (ता. चिपळूण, जि.रत्नागिरी) एमआयडीसीमधील मे.श्री एम पेपर मिल या कंपनीवर कारवाई करणेबाबत**

**(२८) * ३२४३७ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेर्डी (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) एमआयडीसी मधील मे. श्री एम पेपर मिल ही कंपनी वाशिष्ठी नदीपात्रातून दररोज सुमारे ६० हजार लिटर पाण्याचा उपसा विनापरवाना करत असल्याची बाब माहे मार्च, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनी गेल्या अनेक वर्षांपासून एमआयडीसीकडून पाणी घेत नसल्यामुळे एमआयडीसीचे करोडो रूपयांचे नुकसान झाले आहे. तसेच स्थानिक अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय हे शक्य नसल्याने यामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून जितके वर्ष कंपनीने एमआयडीसीकडून पाणी घेतले नाही तितक्या वर्षांची पाणीपट्टी व्याज व दंडासह वसूल करून कंपनीवर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ मार्च, २०२६ च्या पत्रान्वये मा. मंत्री, उदयोग तसेच सचिव, महाराष्ट्र औदयोगिक विकास मंडळ, उदयोग यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व कंपनीवर कारवाई करण्यासह कंपनीकडून नुकसान भरपाई वसूली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) खेर्डी औद्योगिक क्षेत्रातील मे. श्री एम पेपर मिल (पूर्वाश्रमीची मे. श्री एम पेपर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी प्रा. लि.) या कंपनीकडून वाशिष्ठी नदीपात्रातून अनधिकृत पाणी उपसा केल्याबाबत उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, चिपळूण यांनी पत्र क्र.१२९, दिनांक २६/०२/२०२६ अन्वये महामंडळाच्या स्थानिक कार्यालयास अवगत केले आहे. तथापि, कंपनीकडून दररोज सुमारे ६० हजार लिटर पाणी विनापरवाना उपसा होत असल्याबाबतची बाब संबंधित सक्षम यंत्रणेकडून पुष्टी झालेली नाही.
(२) हे खरे नाही.

मे. श्री एम पेपर मिल या कंपनीस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत १०० मि.मी. व्यासाची नळ जोडणी देण्यात आलेली असून सद्य:स्थितीत कंपनीस सरासरी सुमारे ९५० घनमीटर प्रतिदिन पाणीपुरवठा करण्यात येत आहे. कंपनीकडून पाणीपट्टीची कोणतीही थकबाकी नसून पाणीपट्टी थकबाकी शून्य आहे. त्यामुळे महामंडळाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच स्थानिक अधिकाऱ्यांच्या संगनमताबाबत कोणतेही ठोस पुरावे उपलब्ध नाहीत.
(३) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी यासंदर्भात मंत्री, उद्योग तसेच संबंधित प्राधिकरणांकडे निवेदन सादर केल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) मे. श्री एम पेपर मिल कंपनीने पाटबंधारे विभागास दिनांक ०९/०३/२०२६ रोजी सादर केलेल्या पत्रान्वये दि. २६/०२/२०२६ रोजी झालेल्या अनधिकृत पाणी उपशाबाबत आकारण्यात आलेली रु. ४२,६५४/- इतकी रक्कम भरल्याचे दिसून येते. तसेच, कंपनीच्या उत्पादन व पाणी वापराबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २५/०५/२०२६ रोजी माहिती उपलब्ध करून दिली असून ती पुढील कार्यवाहीसाठी दिनांक ०२/०६/२०२६ रोजी पाटबंधारे विभागाकडे पाठविण्यात आली आहे. नदीपात्रातून पाणी उपसा व त्यासंबंधित कारवाई ही पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित येणारी बाब आहे. संबंधित विभागाकडून प्राप्त अहवालानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमीत जमीन पुनर्विकासासाठी खुली करणेबाबत

**(२९) * ३२३७२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील अतिक्रमण केलेल्या ३५ हजार ८०० झोपड्यांच्या पुनर्विकासासाठी एमआयडीसीने मा.मंत्रिमंडळाची मान्यता न घेता काढलेल्या निविदेत औद्योगिक पट्ट्याचे विभाजन करुन एकूण ३३८ एकराचा संपूर्ण पट्टा पुनर्विकासासाठी खुला करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पट्ट्यातील दिघा ते शिरवणे या पट्ट्यातील तीन विभागात होणारा हा प्रकल्प धारावी पुनर्विकासा खालोखाल सर्वात मोठा प्रकल्प असून सदर प्रकल्प राबवित असताना औद्योगिक विकास महामंडळाने उद्योग न उभारता एस आर ए प्रोजेक्ट राबवण्यासाठी निविदा काढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुनर्विकास प्रकल्प राबविताना राज्य शासनाची, वन विभागाची व गृहनिर्माण विभागाची पूर्वपरवानगी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी प्रकल्प रद्द करण्याची मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींकडून होत असून मा.वने मंत्री यांनीही सदर प्रकल्प रद्द करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १० एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन प्रकल्पाची मान्यता रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) म.औ.वि. महामंडळाने टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासाठीच्या प्रकल्पाच्या कामाच्या तीन "प्रस्तावाची मागणी (RFP)" निविदा सूचना क्र. ८९/२०२५-२०२६ अन्वये दिनांक २७/०३/२०२६ रोजी मागविल्या होत्या.

(२) हे खरे नाही.

टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्ट्यांसाठी पुनर्वसन प्रकल्प राबवून मोकळी होणारी जमीन औद्योगिक वापरासाठी उपयोगात आणणे प्रस्तावित होते.

तथापि, महाराष्ट्र शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ अ चे पोटकलमे (१) व (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून शासकीय अधिसूचना, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग दिनांक ०८ सप्टेंबर, २०२० अन्वये मुंबई महानगरप्रदेश क्षेत्रातील (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून) ८ महानगरपालिका व ७ नगरपरिषदांकरीता "मुंबई महानगरप्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण" हे स्वतंत्र प्राधिकरण स्थापन केले आहे. वरील प्रमाणे ८ महानगरपालिका व ७ नगरपरिषदांच्या क्षेत्रातील सर्व धारणाधिकार व मालकी हक्काच्या जमिनी (केंद्र शासनाच्या जमिनी वगळून) झोपडपट्टी क्षेत्र मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या कार्यक्षेत्रात येते. त्यामध्ये टिटिसी औद्योगिक क्षेत्रांसह नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा समावेश करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे आहे.

तथापि, म.औ.वि. महामंडळाने मागविलेल्या "प्रस्तावाची मागणी (RFP)" मध्ये सदर पुनर्विकास प्रकल्प राबविण्यासाठी शासनाच्या सर्व संबंधित विभागांची पूर्व परवानगी घेण्याची अट अंतर्भूत केली होती.

(४) होय, हे खरे आहे.

नवी मुंबई झोपडपट्टी पुनर्विकास योजनेसाठी म.औ.वि. महामंडळाकडून काढण्यात आलेली ई-निविदा

सूचना क्र. ८९/२०२५-२०२६ (मुंबई) रद्द करून सदर प्राधिकार नवी मुंबई महानगरपालिकेस देण्याबाबतचे श्रीमती सुजाता सुरज पाटील, महापौर नवी मुंबई महानगरपालिका यांचे दि. ०१/०४/२०२६ रोजीचे निवेदन जोडून मा.मंत्री, वने यांनी दि. ०१/०४/२०२६ च्या पत्रानुसार निवेदनातील मागणीच्या पुर्ततेबाबत कार्यवाही होण्यासाठी संबंधितांना आदेश द्यावेत अशी विनंती मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती.

(५) प्रस्तुत प्रकरणी शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार प्रशासकीय कारणास्तव म.औ.वि. महामंडळाने मागविलेल्या तिनही "प्रस्तावाची मागणी (RFP)" ई-निविदा सूचना क्र.८९/२०२५-२६ दि.१७/०४/२०२६ रोजी रद्द करण्यात आलेल्या आहेत. विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पाणी टंचाईबाबत

**(३०) * ३२८४२ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.केवलराम काळे (मेळघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धरणांमधील पाणीसाठ्यामध्ये झपाट्याने घट होत असून माहे मे, महिन्याच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील ४११ गावे आणि ११९४ वाड्या अशा १६०५ ठिकाणावरील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावे लागत असून अनेक गावांना १५ दिवसांतून एकदा पाणी मिळत आहे, तर पाणी पुरवठा करीत असलेल्या जिल्ह्यांपैकी सर्वाधिक टँकर छत्रपती संभाजी नगरमध्ये पुरविले जात असल्याचे दिनांक ७ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्हयातील पाणी पुरवठा करणारे कामठी खैरी, तोतलाडोह, खिंडसी, नांद व वडगांव या धरणामध्ये अपूरा जलसाठा असून सदर गावांमधून दिनांक १ ऑक्टोबर, ते ३० जून, या कालावधीत तीन टप्प्यात ११७० गावाचे पाणी टंचाईचे प्रस्ताव सादर झाले आहेत तर शहापूर व मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील निम्म्याहून अधिक गावे, पाडे येथे भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याचे माहे मार्च-एप्रिल मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मेळघाट, चिखलदरा, धारणी (जि.अमरावती) या दुर्गम भागातील १७ गावांमध्ये बोअरवेल आणि खाजगी विहिरी अधिग्रहित करून तहान भागवावी लागत आहे मेळघाटात चिखलमिश्रित व दूषित पाणी पिण्यासाठी वापरावे लागत असल्यामुळे आदिवासी नागरिकांमध्ये पोटाचे विकार, त्वचा रोग आणि संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मेळघाटसह आसपासच्या परिसरातील नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी देण्यासाठी हर घर जल योजनेंतर्गत रु.१२३ कोटी इतके मंजूर केले, परंतु ही योजना अद्याप पर्यंत कागदावर असल्याने येथील पिण्याच्या व वापराच्या पाण्याची समस्या बिकट झाली आहे तसेच राज्यात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने करण्यात येणारी उपाययोजना अपुरी ठरत असल्याने हर घर नळ योजना अद्यापपर्यंत अपूर्ण राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) तसेच, 'जलयुक्त शिवार २.०' अभियानांतर्गत सन २०२६ सालासाठी निश्चित केलेल्या उद्दिष्टांपैकी किती टक्के कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे, मागील दोन महिन्यांत राज्यात टँकर्सची मागणी किती

पटीने वाढली आहे आणि किती गावांना सध्या टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे,
(६) असल्यास, राज्यभरातील सर्व गावातील नागरिकांना आणि जनावरांना पुरेसे स्वच्छ आणि मुबलक पाणी देण्याबाबत, मुंबई व ठाणे शहरांना पाणी उपलब्ध करुन देणाऱ्या शहापूर तालुक्यास पाणी पुरवठा करण्यासाठी व येथील पाणीटंचाई कायमस्वरुपी दूर करण्याबाबत तसेच मेळघाटातील पाणीपुरवठा योजनांचे काम तात्काळ पूर्ण करून आदिवासींना कायमस्वरूपी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

दि. ०४ मे, २०२६ रोजीच्या टँकर अहवालानुसार माहे मे, महिन्याच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील १२ जिल्ह्यांमधील ४११ गावे आणि ११९४ वाड्यांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेल्या जिल्ह्यांपैकी सर्वाधिक टँकर छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये पुरवण्यात आले आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०२५ ते जून, २०२६ या टंचाई कालावधीसाठी नागपूर जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी भाग-१ मध्ये २ कामे तसेच भाग-२ मध्ये ९०५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी नळ योजना दुरुस्ती ३९९, स्त्रोत बळकटीकरण ५९, तात्पुरती पुरक नळ योजना ९, सार्वजनिक विहीर खोलीकरण ९० या योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्या आहेत. सदर कामे ३० जून पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर व मुरबाड या तालुक्यांचा बहुतांश भाग हा डोंगराळ व दुर्गम भागात वसलेला आहे. सदर भागातील गाव-पाड्यांमध्ये अस्तित्वातील पिण्याच्या पाण्याची साधने जसे की, साधी विहीर, हातपंप, नळ पाणी पुरवठा योजना व प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना कार्यरत आहेत. तथापि सदर परिसराची भूस्तरीय रचना दख्खन पठारी भाग व बेसॉल्ट या कठीण खडकांचा असल्याने भूजल स्तरांची घट ही उन्हाळ्यात अतिशीघ्र होते. त्यामुळे टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होते.

सद्य:स्थितीत शहापूर तालुक्यातील १७९ गाव-पाड्यांना ४४ टॅंकरद्वारे व मुरबाड तालुक्यातील १६ गाव-पाड्यांना ०३ टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही, पाणी टंचाई कालावधी मध्ये मेळघाट क्षेत्रातील चिखलदरा तालुक्यात २३ गावांमध्ये २२ बोअरवेल/खाजगी विहिरी व धारणी तालुक्यात ९ गावांमध्ये १० बोअरवेल/खाजगी विहिरी अधिग्रहणद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. सदर अधिग्रहीत केलेल्या विहिरींची जैविक/रासायनिक तपासणी आरोग्य विभागामार्फत करण्यात आली असून सदर पाणी पिण्यायोग्य आहे.

(४) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्र धारणी व चिखलदरा तालुक्यामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दोन्ही विभागामार्फत योजना राबविण्यात येत आहे. धारणी व चिखलदरा तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत २९७ योजना प्रस्तावित असून २७३ योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या आहेत. १२ योजना ७५-९९% दरम्यान आहेत, १ योजना ५०-७५% दरम्यान, ५ योजना २५-५०% दरम्यान तर ६ योजना ०-२५% दरम्यान आहेत.

मेळघाटातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत १०४ गावांसाठी ७ प्रादेशिक योजना प्रगतीपथावर आहे. सदर योजनांकरीता रु. २३८.५२ कोटी जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेले आहेत. सदर योजनांची सरासरी भौतिक प्रगती ७९ टक्के एवढी आहे. योजनेची कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याकरीता कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

ज्या गावांमध्ये योजना प्रगतीपथावर आहे त्या गावांमध्ये अस्तित्वातील योजनेवरून पाणी पुरवठा सुरू आहे. तसेच टंचाई कालावधी मध्ये आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(५) राज्यात शासन निर्णय दि.०३.०१.२०२३ अन्वये जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येत आहे. सद्य:स्थितीत अभियानांतर्गत निवडलेल्या ५८५८ गावांमध्ये गाव आराखड्याप्रमाणे प्रस्तावित कामांची एकूण संख्या १,४२,०६८ (अभिसरणासह) इतकी असून माहे मार्च, २०२६ अखेरपर्यंत एकूण १,१०,१२० कामे (अभिसरणासह) पूर्ण झाली आहेत. अल निनोच्या पार्श्वभूमीवर मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने अभियानांतर्गत सुमारे १७६७४ कामे (अभिसरणासह) दि.१५.०६.२०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून त्यानुषंगाने क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

माहे एप्रिल २०२६ च्या शेवटच्या (चौथ्या) आठवड्यामध्ये राज्यात एकूण ३२१ टॅंकर तर माहे मे २०२६ च्या शेवटच्या (चौथ्या) आठवड्यामध्ये राज्यात एकूण ८६८ टॅंकर सुरु होते. सद्य:स्थितीत दि.१५.०६.२०२६ रोजीच्या टॅंकर अहवालानुसार राज्यातील २२ जिल्ह्यांमधील १०९९ गावे व ३०२४ वाड्यांमध्ये एकूण १२१९ टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(६) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यामध्ये जल जीवन मिशन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत असून या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई ५५ लिटर प्रती दिन गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करण्याचे उदिष्ट आहे.

शहापूर तालुक्यातील प्रामुख्याने टंचाईग्रस्त गांव पाड्यांना कायमस्वरुपी टंचाई मुक्त करण्यासाठी जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत भावली प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत मुख्य उद्भव व जल शुद्धीकरण केंद्र मुख्य गुरुत्व वाहिनी व संतुलन टाक्या इ. कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत करण्यात येत आहेत व ग्रामस्तरावरील साठवण टाक्या व वितरण वाहिन्या ही कामे जिल्हा परिषद ठाणे मार्फत करण्यात येत आहेत.

मेळघाटातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत १०४ गावांसाठी ७ प्रादेशिक योजना प्रगतीपथावर आहे. सदर योजनांकरीता रु. २३८.५२ कोटी जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेले आहेत. सदर योजनांची सरासरी भौतिक प्रगती ७९ टक्के एवढी आहे. योजनेची कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याकरीता कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे थकीत अनुदान अदा करणेसह प्रलंबित मागण्या पूर्ण करणेबाबत

**(३१) * ३२९३४ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस हे पोषण आहार वितरण, बालसंवर्धन, महिला आरोग्य तपासणी,कुपोषण निर्मूलन, विविध सर्वेक्षणे तसेच शासनाच्या अनेक योजनांची अंमलबजावणी करणे इत्यादी कामांमध्ये महत्वपूर्ण योगदान देत असून त्यांना राज्य शासनाकडील मानधनाचा हिस्सा नियमित वितरित होतो मात्र केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा हिस्सा अनुक्रमे रुपये ४५०० व रुपये ३५०० इतका वितरीत झाला नसल्याने त्यांचे मानधन थकीत असल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानधन वितरणासाठी सुरू करण्यात आलेल्या “स्पर्श” या प्रणालीमध्ये बँक लिंकिंग, डेटा अपडेट व तांत्रिक अडचणी येत असल्याने त्यांना मानधन वितरणात विलंब होत असल्याने जुन्या पद्धतीने मानधन देण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत मा.मंत्री, महिला व बालविकास यांच्या दालनात त्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची अद्यापी अंमलबजावणी झालेली नसल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अंगणवाडी कर्मचा-यांच्या प्रलंबित मागण्यांसह केंद्र शासनाकडे प्रलंबित निधीसाठी पाठपुरावा करणे, थकीत मानधन व निधी वितरण प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी दूर करणे, नियमित मानधन वितरीत करणेसह पारदर्शकता आणणे तसेच भविष्यात अशा प्रकारचा विलंब होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरित करण्यासाठी SNA SPARSH या कार्यपद्धतीची अंमलबजावणी करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिलेले आहेत. त्यानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने सदर योजनेमध्ये SNA SPARSH कार्यपध्दतीद्वारे अंमलबजावणी करणेबाबत अनिवार्य करण्यात आले आहे. सुरूवातीच्या कालावधीत SNA SPARSH ची कार्यपध्दती पूर्णतः नविन असल्याने तसेच विविध तांत्रिक अडचणीं आल्याने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना केंद्र हिस्सा व त्यास समरूप राज्य हिश्याचे मानधन अदा करणे प्रलंबित राहिले होते. तथापि, तदनंतरच्या कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करून अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे माहे डिसेंबर, २०२५ ते माहे मे, २०२६ पर्यंतचे सदर केंद्र हिस्सा व त्यास समरूप राज्य हिश्याचे मानधन अदा करण्यात आले आहे.

तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना अतिरिक्त राज्य हिश्यामधून देय असलेले मानधन नियमीतपणे अदा करण्यात आले आहे.

(३) व (४) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या राज्यस्तरावरील मागण्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाशी संबंधित मागंण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. त्याचप्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन वेळेत वितरीत करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय व खाजगी कार्यालयांमध्ये “कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक” (पॉश ॲक्ट) कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत**

**(३२) * ३२४५७ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश सुर्वे**

**(मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खासगी आस्थापनांमध्ये “कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक” (Prevention of Sexual Harassment Act (पॉश ॲक्ट) या कायद्यानुसार तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक कार्यालयांमध्ये अशा समित्या अस्तित्वात नसणे, केवळ कागदोपत्री असणे, तसेच समित्यांचे प्रभावी कार्य न होणे, प्रशिक्षणाचा अभाव, वार्षिक अहवाल सादर न करणे इत्यादी त्रुटी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पार्श्वभूमीवर राज्य महिला आयोगामार्फत सर्व शासकीय व खासगी कार्यालयांचे “पॉश ऑडिट” करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नियमांचे पालन न करणाऱ्या संस्थांवर कारवाई करणेसह सर्व शासकीय व खाजगी कार्यालयांचे “पॉश ऑडिट” करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) खरे आहे.

(२)अंशत: खरे आहे.

(३ ) व (४) नाही.

Posh Act २०१३ मधील कलम २५ नुसार अधिनियमाच्या अंमलबजावणी बाबत राज्य शासनाने प्राधिकृत केलेले अधिकारी तपासणी करतील असे नमूद आहे. त्यानुसार शासन परिपत्रक दिनांक १४ मे, २०२६ नुसार १२ संवर्गातील अधिकाऱ्यांना तपासणी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

उपरोक्त ३ नुसार तपासणी अधिकाऱ्यांचे प्रत्येक जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण भागातील तपासणीसाठी क्षेत्र व उद्दिष्ट निश्चित करुन घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील बालकांचे होणारे मृत्यू कमी करण्याकरिता करावयाची उपाययोजना**

**(३३) * ३६८१४ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार सन २०२५-२६ दरम्यान राज्यात ५ वर्षांखालील १२,७२९ बालकांचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, मुदतपूर्व प्रसूती आणि कमी वजनाचे बाळ, श्वसनाचे विकार, न्यूमोनिया, सेप्सिस, तसेच दुर्गम व ग्रामीण भागातील मातांच्या आरोग्याकडे आणि लसीकरण मोहिमेकडे दुर्लक्ष होत असणे इ. विविध कारणांमुळे सद्य:स्थितीत राज्यात दिवसाला सरासरी ३५ बालकांचा मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील बालमृत्यूचे प्रमाण शून्यावर आणणे आणि प्रत्येक बालकाचे लसीकरण सुनिश्चित करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अशंत: खरे आहें.

बालमृत्युची प्रमुख कारणे म्हणजे मुदतपूर्व प्रसूती व कमी वजनाची बालके, श्वसनविकार, न्यूमोनिया, सेप्सिस (जंतुसंसर्ग) आणि जन्मावेळी होणारा श्वासावरोध. दुर्गम व ग्रामीण भागातील मातांचे आरोग्य, आरोग्य सेवांची उपलब्धता, भौगोलिक अडचणी या बाबींमुळे बालमृत्यू होत आहे.
(३) बालमृत्युची कारणे विचारात घेऊन नियमित आढावा घेतला जात असून खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

बालमृत्यू कमी करण्यासाठी व प्रत्येक बालकाचे लसीकरण सुनिश्चित करण्यासाठी शासनामार्फत विशेष नवजात बालक काळजी कक्ष (SNCU), नवजात बालक स्थिरीकरण कक्ष (NBSU), नवजात बालक काळजी कोपरा (NBCC), पोषण पुनर्वसन केंद्र (NRC), घरच्या घरी नवजात व लहान बालकांची काळजी (HBNC/HBYC), SAANS, MAA, स्टॉप डायरिया कॅम्पेन, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, ॲनिमिया मुक्त भारत आणि नियमित लसीकरण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

तसेच मातांच्या आरोग्यासाठी जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, संस्थात्मक प्रसूती प्रोत्साहन, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, वात्सल्य कार्यक्रम, अतिजोखमीच्या गर्भवतींचे व्यवस्थापन आणि गर्भावस्थेतील जन्मजात व्यंग तपासणी यांसारख्या योजना राबवून माता व बाल आरोग्य सुधारण्यावर भर दिला जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलजीवन मिशन योजनेची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(३४) * ३२५२२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.आशुतोष काळे (कोपरगाव), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर),**

**श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या ५१ हजार ५६० योजनांच्या कामांपैकी २४ हजार योजनांची कामे केलेल्या कंत्राटदारांची सुमारे रुपये ५० हजार कोटींची देयके निधी अभावी थकीत असल्याने महाराष्ट्र राज्य शासकीय पाणीपुरवठा संघटनेने दिनांक १५ एप्रिल, २०२६ पासून काम बंद करण्याचा इशारा शासनास दिल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषत: नागपूर जिल्हयातील “हर घर जल” या योजनांची रु. २७ कोटी २३ इतक्या लाख रकमेची कामे प्रलंबित असणे, जलजीवन मिशन योजनेचे इस्टिमेट तालुक्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध नसणे, राजूलवाडी (जि.नागपूर) गावातील पाण्याच्या टाकीचे व पाईपलाईनचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होणे तसेच रु.१ कोटी ७८ लाख ४१ हजार इतक्या रकमेच्या या योजनेत सोलरचे काम, विहिरीवर व्हॉल्व्ह नसणे, पाईपलाईन वितरणाची कामे बाकी असणे तसेच वेलसाखरा (जि.नागपूर) गावात ३४ वर्षे जुनी पाईपलाईन फुटली असल्याने दुरुस्तीचे काम करणे, नवेगाव (साधू) (ता.उमरेड, जि.नागपूर) येथे पाण्याच्या टाकीचे काम निधी अभावी प्रलंबित असणे, अमरावती जिल्ह्यात ४७ योजना निधीअभावी प्रलंबित असणे, भंडारा जिल्हयात कोट्यवधी रुपये खर्च करून जलकुंभ उभारण्यात येऊनही नळाद्वारे पिण्याचे पाणी मिळत नसणे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, गडचिरोली जिल्ह्यात नळपाणी पुरवठा योजना १) मौजे भगवानपूर, २) मौजे चांदागड, ३) मौजे सोनेरांगी, ४) मौजे चिरचाडी, ५) मौजे येरंडी ही कमी दराने होत असणे, श्री.अमित ठाकूर, तत्कालिन कार्यकारी अभियंता (प्रभारी) यांनी कंत्राटदारांना प्राईज व्हेटिएशन क्लॉज लागू करुन कोणतीही तपासणी न करता देयके अदा करुन अनियमितता केली, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, हिंगोली जिल्ह्यात घरगुती नळ जोडणी योजनेतील अनियमितता, मंजूर नळ जोडणी कामांची मुदत संपूनही कंत्राटदारांनी कामे प्रलंबित ठेवणे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उपअभियंता (स्थापत्य) यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, “हर घर नळ” या योजनेची कामे निधीअभावी अपूर्ण असणे, कच्चे मालाचे दर वाढल्यामुळे जिल्हयातील ८६० प्रस्तांवाना सुधारित प्रशासकीय मान्यता नसणे, मराठवाडा विभागात सुमारे रु. १ हजार ८९ कोटी निधीची आवश्यकता असल्यामुळे कामे प्रलंबित असणे, नांदेड जिल्हयात निधी अभावी कामे प्रलंबित असणे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यात अनेक कामे अपूर्ण असूनही ठेकेदारांची बिले अदा करणे, अंदाजपत्रकातील बाबी परस्पर बदलणे, काही बाबी न करता एमबी रेकॉर्ड करणे, पाईपलाईन जमिनीच्या खाली पुरेशी न टाकताही सर्व ठेकेदारांची बिले अदा करणे, पालघर जिल्ह्यात मंजूर कामे निधी अभावी प्रलंबित असणे, योजनेच्या कामाच्या देयकावर बनावट स्वाक्षऱ्या करून पैसे लाटणे, ठेकेदारांनी अगोदर केलेल्या कामांची देयके न मिळणे, रायगड जिल्ह्यातील बेलोशी ग्रामपंचायत हद्दीतील वळवली गावासाठी मंजूर करण्यात आलेली सुमारे ९७ लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना निधीअभावी तीन वर्षांनंतरही अपूर्ण असणे, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच, सांगली जिल्ह्यातील कामांना निधी मिळत नसल्याने कामे प्रलंबित असणे, पुणे जिल्ह्यात पाणीपुरवठा, जलजीवन मिशनच्या कामांना निधी मंजूर असूनही कामांमध्ये विलंब होणे, कामे निकृष्ट दर्जाची होणे, अनेक

गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागणे, सोलापूर जिल्हयात उपअभियंता, शाखा अभियंता यांनी ठेकेदारांशी संगनमत करून पाणी पुरवठयांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करुन बनावट देयके सादर करणे तसेच सदर कामांमध्ये निकृष्ट दर्जाची साहित्य वापरुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,

(७) तसेच, अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२२-२३ मध्ये मंजूर योजनेच्या कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्रलंबित असणे, घोडेगाव येथे सुमारे रु.४८ कोटी ८३ लाख इतक्या खर्चाची पाणी योजना मंजूर असूनही मागील चार वर्षांपासून अपूर्ण असणे, अपूर्ण कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना न केल्याने तलावात बुडून तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू  झाला असणे, तसेच जळगाव जिल्ह्यात निधी अभावी ९०० योजनांची कामे अपूर्ण असणे, कंत्राटदारांचे रु.१३५ कोटी इतके बिल थकीत असल्याने कामे वेळेवर न होणे, केंद्र शासनाकडून रु.१२ हजार ८०० कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही तो स्थानिक पातळीवर प्राप्त न होणे, इ.अनेक जिल्हयांमध्ये सदर योजना अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, उक्त सर्व प्रकरणांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्यासह सर्व योजना कार्यान्वित करुन ग्रामस्थांना नियमित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करणे, स्पेशल स्कॉड नेमून झालेल्या कामाच्या दर्जाची तपासणी व नळ पाणीपुरवठा योजनेचे उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात जलजीवन मिशन अंतर्गत सुरु असलेल्या सुमारे ५१,५६० योजनांच्या कामांपैकी सुमारे २७,८२३ योजनांची कामे पूर्ण आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. अंमलबजावणी यंत्रणांनी कळविल्यानुसार माहे  मे, २०२६ अखेरपर्यंत कंत्राटदारांनी सादर केलेली सुमारे रु.५,१८३ कोटीची देयके निधी अभावी जिल्हा स्तरावर थकीत आहेत.  त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य शासकीय पाणीपुरवठा संघटनेने दि. १५ एप्रिल, २०२६ पासून काम बंद करण्याचा इशारा शासनास दिल्याचे पत्र प्राप्त झाले आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात विशेषत: नागपूर जिल्ह्यातील जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत सुमारे १४०९ (१४ योजनांची कामे रद्द ) नळ पाणी पुरवठा योजनांची कामे असून सुमारे ५०३ प्रगतीपथावरील योजनांच्या अनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील सुमारे रु.२२६.८ कोटीची देयके प्रलंबित आहेत.

जल जीवन मिशन योजनेच्या आवश्यकतेनुसार ग्रामपंचायतींना अंदाजपत्रकांच्या प्रती उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

राजूलवाडी (जि.नागपूर) योजनेची किंमत सुमारे रू.४७.२१ लक्ष आहे. सदर योजनेची खालची राजूलवाडी तसेच वरची राजूलवाडी असे दोन भाग असून, खालची राजूलवाडी मध्ये पाण्याच्या टाकीचे काम जमीन पातळीपर्यंत झालेले आहे व ते समाधानकारक असून त्या ठिकाणी पाणी पुरवठा सुरू करण्यात आलेला आहे. वरच्या राजुलवाडीमध्ये पाण्याच्या टाकीचे काम वन विभागाने उशिरा परवानगी दिल्यामुळे तसेच केंद्रशासनाकडून निधी प्राप्त न  झाल्यामुळे कंत्राटदाराने सुरू केलेले नसून त्यास कामे पूर्ण करण्याबाबत लेखी सूचना दिलेल्या आहेत. तसेच योजनेतील सोलरचे काम प्रलंबित आहेत.

वेलसाखरा, (जि.नागपूर) या गावात जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत मंजूर योजनेची किंमत सुमारे रू.७१.८४ लक्ष  आहे. योजनेची कामे पूर्ण करून गावास पाणी पुरवठा सुरू करण्यात आलेला आहे. सध्या पाणीटंचाई कार्यक्रमांतर्गत नादुरूस्त असलेली जूनी उर्ध्वनलिका बदलण्यात आली आहे.

नवेगाव (साधू) (ता. उमरेड, जि. नागपूर) या योजनेच्या कामापैकी  वितरण व्यवस्थेचे काम ५०% पूर्ण झालेले आहे. उर्ध्वनलीकेचे काम ५० % पूर्ण झालेले आहे. बाकी कामे अपूर्ण अवस्थेत आहे. अमरावती

जिल्ह्यातील काही योजनांची निधी अभावी गती मंदावली असून, भौतिकदृष्ट्या पूर्ण योजनांचे देयके निधी अभावी प्रलंबित आहे.

भंडारा जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेअंतर्गत एकूण सुमारे ९२० योजना असून त्यापैकी सुमारे ६२४ योजनांची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली असून, सुमारे २९६ योजनांची कामे निधी अभावी प्रलंबित आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत मंजूर ४ योजनांपैकी ३ योजनांची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण असून १ योजना कार्यान्वित आहे. तथापि, अस्तित्वातील पाणी पुरवठा साधनांद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर योजनांचे निविदा करतांना कंत्राटदारांनी वाढीव दरात कंत्राट भरले तेव्हा सदर कामांचे शुद्धीपत्रक आलेल्या दरसूचीनुसार Evaluated cost काढून जेवढी जादा दर येते त्यानुसार कार्यारंभ आदेश देणे क्रमप्राप्त होते. वाटाघाटीअंती Evaluated cost नुसार जादा दराची निविदा मान्य करून कामांचे कार्यारंभ आदेश संबंधित कंत्राटदारास देणे शक्य होते. तत्कालीन कार्यकारी अभियंता (श्री.अमित तुरकर) यांनी सदर जादा दराची निविदा प्रकरण नस्ती योग्य मार्गे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या लेखी शेरा व मार्गदर्शनाकरीता सादर करण्यात आलेली नाही. किंवा वरीष्ठ कार्यालयास मार्गदर्शन मागीतले नाही. परंतु तसे न करता As per schedule नुसार (जुन्या दराने) भावभिन्नता कलमाचा समावेश (price variation clause) करून कार्यारंभ आदेश पारित करण्यात आला, कार्यारंभ आदेश पारित करतांना अनियमितता करण्यात आली हे खरे आहे. (price variation clause) संदर्भात दि.२९.६.२०२२ च्या शासन निर्णयानुसार सदर योजनांचा कामाचा कालावधी १ वर्ष पर्यंत मर्यादित असल्याने सदर शासन निर्णय लागू होत नाही, त्यामुळे अतिरिक्त रक्कम अदा करणे शक्य होत नाही. त्यामुळे जिल्ह्याकडून Schedule B नुसारच मूळ Schedule दरात देयके अदा करण्यात आली असून, अतिरिक्त दराने देयके अदा करण्यात आलेली नाहीत. सदर प्रकरणाची चौकशी सुरु आहे.

(४) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या अहवालानुसार हिंगोली जिल्ह्यात घरगुती नळ जोडणीच्या एकूण सुमारे ६१ कामांपैकी सुमारे ४६ पूर्ण झाली आहेत व उर्वरीत सुमारे १५ कामे पूर्ण करुन घेण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून नळ जोडणी योजनेत अनियमितता झालेली नाही.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उपअभियंता (स्थापत्य) यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली नाही. जल जीवन मिशन मधील नळ पाणी पुरवठा योजनांची कामे निधी अभावी प्रलंबित आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वस्तू व सेवा करातील दरामध्ये वाढ, जादा दराच्या निविदा स्विकृतीमुळे तसेच तांत्रिक बदल या कारणांमुळे सुमारे ८६० प्रस्ताव सुधारित होणार असून, त्यापैकी सुमारे ४३४ योजनांना सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त आहेत. ऊर्वरीत सुमारे ४२६ योजनांना सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे बाबतची कार्यवाही चालू असून मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीत ५० लक्षपर्यंत वाढ होणाऱ्या योजनांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार दि.२०.२.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले असून, त्यानुषंगाने १०७ योजनांचे शासनास प्राप्त प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालय, छ.संभाजीनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहेत. तसेच उर्वरित योजनांचे प्रस्ताव क्षेत्रिय यंत्रणांकडून विभागीय आयुक्त यांना तसेच शासनास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने सादर करण्यात येत आहेत.

मराठवाडा विभागात योजनांची कामे प्रलंबित असून, सदर कामासाठी सद्य:स्थितीत सुमारे १५३४ कोटी निधीची आवश्यकता आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये सुमारे १०५२ योजनांची कामे प्रलंबित असून निधी अभावी कामे संथ गतीने सूरू आहेत.

(५) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या अहवालानूसार गुहागर (जि. रत्नागिरी) तालुक्यात जिल्हा परिषदे

अंतर्गत अशी बाब आढळून आलेली नाही. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्ये गुहागर तालुका, रत्नागिरी धोपावे पाणी पुरवठा योजनेकरीता चौकशी समिती स्थापण करण्यात आली असून, सदर समितीमार्फत चौकशीची कार्यवाही सूरू आहे.

पालघर जिल्ह्यात नळ पाणी पुरवठा योजनांची कामे तसेच देयके निधी अभावी प्रलंबित आहेत. योजनेच्या कामाच्या देयकावर बनावट स्वाक्ष-या केल्याबाबतच्या तक्रारीनूसार कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. तक्रारीत नमूद केलेल्या कामाचे देयक अदा करण्यात आलेले नाही.

रायगड जिल्हयातील बेलोशी ग्रामपंचायत हद्दीतील वळवली योजना सुमारे रु.९८.९७ लाख खर्चाची योजना मंजूर असून योजनेची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. योजना संबंधित ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

(६) होय, हे अंशत: खरे आहे.

सांगली जिल्ह्यात काही योजनांची कामे तसेच सुमारे रू.५१.७० कोटीची देयके निधी अभावी प्रलंबित आहेत.

पुणे जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत एकूण सुमारे २८३८ पाणीपुरवठा योजनांची कामे मंजूर असून, त्यापैकी सुमारे १५३७ योजनांची कामे पूर्ण आहेत. उर्वरित सुमारे १३०१ योजना प्रगतीपथावर असून, त्यापैकी सुमारे ४२९ योजनांची कामे निधी अभावी प्रलंबित आहेत. योजनांच्या कामांच्या दर्जाची त्रयस्थ तपासणी यंत्राणांकडून तपासणी करुनच देयके अदा केली जातात. सदर संस्थेने उपस्थित केलेल्या निरिक्षण मुद्यांची पूर्तता वेळेवर केली जाते. सद्य:स्थितीत अस्तित्वातील योजनेद्वारे पाणी पुरवठा चालू असून ११९ गावांना टँकर द्वारे पाणी पुरवठा चालू आहे. सदर गावांमध्ये जल जीवन मिशनची कामे प्रगतीपथावर असून ती पूर्ण झाल्यानंतर टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा बंद करण्यात येईल.

राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या अहवालानुसार सोलापूर जिल्ह्यातील तसेच राज्यात त्रयस्थ तपासणी यंत्रणांकडून योजनांच्या कामांची तपासणी करुनच देयके अदा केली जातात. सदर जिल्ह्यात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(७) होय, हे अंशत: खरे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२२-२३ मध्ये मंजूर योजनेच्या कामांसाठी, सुमारे १४८ योजनांच्या सुधारीत प्रस्तावांना मान्यता देण्यात आली असून, सुमारे ५०४ योजनांचे प्रस्ताव सुधारित प्रशासकीय मान्यता प्रक्रियेमध्ये असून मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीत रु.५० लक्षपर्यंत वाढ होणाऱ्या योजनांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार दि.२०.२.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आले असून, त्यानुषंगाने ४२ योजनांचे शासनास प्राप्त प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहेत. तसेच उर्वरित योजनांचे प्रस्ताव क्षेत्रिय यंत्रणांकडून विभागीय आयुक्त यांना तसेच शासनास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने सादर करण्यात येत आहेत.

सद्य: स्थितीत घोडेगाव योजनेची भौतिक प्रगती ७५% आहे व आर्थिक प्रगती ५५ % आहे. योजनेतील समाविष्ट विविध उपांगे साठवण तलाव, उंच पाण्याच्या टाक्या यांच्या जागा ग्रामपंचायतीकडून विलंबाने मिळाल्याने योजनेची कामे पूर्ण करण्यास उशीर झालेला आहे. तसेच साठवण तलावाची जागा मागणी केल्यापेक्षा कमी मिळाल्याने साठवण तलावाच्या किंमतीमध्ये वाढ झालेली असल्याने कामे पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे. साठवण तलावाच्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात आलेल्या होत्या तथापि, सदर ठिकाणी सुरक्षा व्यवस्था भेदून घोडेगाव गावातील ३ विद्यार्थी पोहण्यासाठी गेले असता बुडून मृत्यू झाला आहे. याबाबत सोनई पोलीस स्टेशन, ता. नेवासा मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून याबाबत तपास व पुढील कार्यवाही चालू आहे.

जळगाव जिल्ह्यात सुमारे ९३६ योजना अद्याप अपूर्ण असून, एकूण सुमारे रु.१४२.७ कोटी रकमेची देयके

थकीत आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत केंद्र शासनाकडून  सुमारे रु.१२ हजार ८०० कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही तो स्थानिक पातळीवर प्राप्त न होणे, अशी बाब नाही. केंद्र शासनाकडून माहे ऑक्टोबर, २०२४ पासून केंद्र हिश्शाचा निधी अप्राप्त आहे. त्यापूर्वी प्राप्त झालेला निधी विहित कार्यपध्दतीनुसार अंमलबजावणी यंत्रणांना वेळोवेळी वितरीत करण्यात आला आहे व उपरोक्त यंत्रणांनी प्राप्त निधीचा पूर्णपणे विनियोग ही केलेला आहे. सद्य:स्थितीत निधी अभावी कामे मंदगतीने चालू आहेत.

(८) जल जीवन मिशन अंतर्गत कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधितांविरुद्ध वेळोवेळी कारवाई करण्यात येते, त्यानुसार योजनांच्या कामांमध्ये कसूर करणाऱ्या १११ कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्यात आले असून दोषी कंत्राटदारांवर सुमारे रू.३०४.०५ कोटी दंड आकारण्यात आला आहे. सदर दोषी कंत्राटदारांकडून सुमारे रु.७४.५९ कोटी दंड वसुल करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे १८८ प्रकरणांमध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थांना तसेच ८ प्रकरणांमध्ये त्रयस्थ तपासणी यंत्रणांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच ४६४ अभियंता/अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून ३ अभियंतांवर कारवाई करण्यात आली आहे.

कामांची गुणवत्ता तसेच दर्जा सुनिश्चित करण्यासाठी त्रयस्थ पक्ष तपासणी यंत्रणा (TPI) निर्माण करण्यात आली असून, सदर यंत्रणेमार्फत झालेल्या कामांची प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता तपासणी करण्यात येत असून त्याप्रमाणे नियोजन करण्यात आले आहे. तसेच केंद्रीय समन्वय अधिकारी (CNO) यांच्यामार्फत निवडक योजनांची तपासणी करुन आवश्यक सुधारणात्मक सूचना दिल्या जातात व त्यानुसार उपाययोजना केली जाते. राज्यस्तरावरही अशाच पद्धतीने राज्य समन्वय अधिकारी यांच्यामार्फत निवडक योजनांची तपासणी करुन आवश्यक सुधारणात्मक सूचना दिल्या जातात व उपाययोजनात्मक कार्यवाही केली जाते. केंद्र सरकारकडून अंतर्गत लेखा तपासणी पथक पाठवून निवडक योजनांचे लेखापरिक्षण केले जाते व त्यानुसार सुधारणात्मक सूचना देणारा अहवाल सादर केला जातो. माहे ऑक्टोबर-२०२४ पासून केंद्रशासनाकडून केंद्र हिश्शाचा निधी प्राप्त झाला नसल्याने, प्रगतीपथावरील योजनांची प्रगती मंदावली आहे. तथापि केंद्र शासनाचा निधी प्राप्त करुन घेण्यासाठी सातत्याने (दि.७.१०.२०२४ व दि.०५.०५.२०२५ व दि.१३.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रधानसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचेमार्फत दि.०७.०१.२०२५, दि.१४.०५.२०२५, दि.०६.०८.२०२५ व दि.२९.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.मंत्री महोदय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचेमार्फत, तसेच दि.१०.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांच्याकडून) पाठपुरावा करण्यात आला आहे.

पाणी हा राज्यसूचीतील विषय असल्याचे नमूद करुन केंद्र हिश्याचा निधी प्राप्त होईपर्यंत राज्य शासनाने राज्य हिश्याच्या आगाऊ निधीची व्यवस्था करणेबाबत केंद्र सरकारकडून निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार राज्य शासनाकडून सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये अनुक्रमे विशेष बाब म्हणून सुमारे रु.२४८३.५८ कोटी व सुमारे रु.२३४८.२९ कोटी असा एकूण सुमारे रु.४८३१.८७ कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणांना उपलब्ध करुन दिला आहे, त्यामुळे योजनांच्या कामांची प्रगती चालू ठेवण्यास मदत झाली आहे.

उपरोक्त अगाऊ खर्चाच्या अनुषंगाने सद्य:स्थितीत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत  टप्पा- २.०  अंतर्गत केंद्र शासनाच्या दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनाने जल जीवन मिशन योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये केंद्र हिस्सा अप्राप्त असतांना केंद्र हिश्याच्या भारापोटी ३१ मार्च, २०२६ पर्यंत खर्च केलेल्या एकल ग्राम योजनांकरिता (SVS) नियमोचित परतावा (Reimbursment) करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास सन २०२६-२७ मध्ये जल जीवन मिशन टप्पा २.० अंतर्गत एकूण रु. ६२००.७ कोटी इतका तात्पुरता नियतव्यय मंजूर केला आहे तसेच केंद्र

शासनाकडून माहे जून, २०२६ अखेरपर्यत रू.१२.७४ कोटी व रू.१२५.६३ कोटी असा एकूण १३८.३७ कोटी प्रतिपुर्ती अंतर्गत निधी प्राप्त झाला आहे. केंद्र शासनाने सन २०२६-२७ मध्ये उपलब्ध करुन दिलेल्या तात्पुरत्या नियतव्ययापैकी दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रान्वये जल जीवन मिशन टप्पा २.० खाली SNA SPARSH प्रणालीन्वये रू.४७४.६३ कोटी मदर सँक्शन दिले आहे.

केंद्र शासनामार्फत योजनांचे RPWSS ID तयार करणे, Financial Reconciliation करणे, SNA Sparsh on Boarding करणे, जलसेवा आंकलन करणे, जिल्ह्यांमध्ये DTU (District Technical Unit) स्थापन करणे तसेच Source Sustenance Committee स्थापन करणे, Sujalam ID तयार करणे या अटी शर्तीच्या आधारे निधी उपलब्ध करून देण्याबाबत तयारी दर्शविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पुर्तता करून घेण्याबाबत जिल्ह्यांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही चालू असून, कार्यपूर्तता होताच निधी उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

-----------------

## कोनसई (ता.वाडा, जि.पालघर) येथे बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या फटाका कारखान्यात झालेल्या स्फोटाबाबत

**(३५) * ३२८४६ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), श्री.उत्तमराव जानकर (माळशिरस), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोनसई (ता.वाडा, जि.पालघर) येथील एका फार्म हाऊसमध्ये बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या फटाका निर्मिती उद्योगात माहे एप्रिल, २०२६ च्या तिसऱ्या आठवड्यात भीषण स्फोट होऊन दोन कामगारांचा मृत्यू झाला व सहा महिला कामगार गंभीर जखमी झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फटाका कारखाना मागील पाच महिन्यांपासून कोणत्याही शासकीय परवानगीशिवाय सुरू होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक झोन असलेल्या वाडा तालुक्यात अशा प्रकारे छुप्या पद्धतीने ‘पोल्ट्री फार्म’च्या नावाखाली बेकायदेशीर फटाके बनविण्याचे उद्योग सुरू असताना स्थानिक पोलीस प्रशासन व महसूल यंत्रणेचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने या घटनेला जबाबदार असलेल्या कारखाना मालकांवर व व्यवस्थापनावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासह या घटनेमध्ये मृत्यू पडलेल्या व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच भविष्यात अशा घटना रोखण्याकरिता तालुक्यात सुरू असलेल्या इतर संशयास्पद उद्योगांची तपासणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून परवाना न घेता कोनसई (ता.वाडा, जि. पालघर) येथील अनधिकृतपणे सुरु असलेल्या फटाका निर्मिती करणाऱ्या कारखान्यात माहे एप्रिल, २०२६ च्या तिसऱ्या आठवड्यात स्फोट होऊन दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला व पाच महिला कामगार जखमी झाल्या होत्या.

(३) हे खरे नाही. सदरचा फटाके बनवण्याचा कारखाना निर्जनस्थळी सुरु असल्यामुळे प्रशासनाच्या निदर्शनास आला नाही.

(४) पोलीस प्रशासनाकडून एकूण सहा आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३ सह स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८ अंतर्गत दिनांक २१/०४/२०२६ रोजी वाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे. सद्य:स्थितीत तीन आरोपी अटकेत असून तीन आरोपी यांना जामीन प्राप्त झाला आहे.

सदर फटाके बनविण्याचा कारखाना व्यवसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० अंतर्गत परवाना न घेता सुरु होता. दिनांक २०/०४/२०२६ रोजी सदर कारखान्यामध्ये झालेल्या स्फोटाची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असून सदर कारखान्याच्या मालकावर महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ४(४) नुसार तसेच व्यवसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० चे कलम ६(२)(अ) अंतर्गत भंग आढळून आला आहे. सदर भंगासाठी कारखान्याच्या भोगवटादाराविरुद्ध न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर कारखाना बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

सदर घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाईसाठी श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, ठाणे यांना कळविण्यात आले आहे.

तालुक्यात सुरू असलेल्या अनधिकृत कारखान्यांवर कारवाई करण्यासाठी महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि इतर शासकीय यंत्रणांच्या समन्वयाने तपासणी मोहीम सुरू आहे. याद्वारे विनापरवाना कारखान्यांना भेटी देऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे, तसेच त्यांना कायदेशीररीत्या नोंदणीकृत करून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये आवश्यक औषध साठा नियमित ठेवणेबाबत

**(३६) * ३२४५९ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुहास बाबर (खानापूर), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाअंतर्गत असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व

संलग्न रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा, औषध वितरण व्यवस्थेतील त्रुटी यामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना आवश्यक औषधे रुग्णालयातून उपलब्ध करून न देता त्यांना बाहेरून खरेदी करण्यास सांगितले जात असल्याच्या असंख्य तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण विभाग, यांनी रुग्णांना उपचारासाठी आवश्यक असलेली औषधे रुग्णालयातील औषध साठ्यातूनच उपलब्ध करून देणे व औषधांचा तुटवडा टाळण्यासाठी औषध साठ्यांची नियमित तपासणी करणे अशा सूचना माहे एप्रिल, २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सूचनांचे काटेकोर पालन करण्यात येते की नाही याची पडताळणी करून अहवाल सादर करण्याची जबाबदारी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता, वैद्यकीय अधिक्षक यांच्यावर सोपविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रुग्णांना रुग्णालयातच आवश्यक औषधे उपलब्ध होण्यासाठी औषध साठा नियमित ठेवणेसह व रुग्णांना बाहेरून औषधी खरेदी करण्यास सांगणारे डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.
(२) होय.
आयुक्त, वैद्यकीय शिक्षण संशोधन व आयुष यांनी संचालनालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना दि.०७.०४.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना दिल्या आहेत.
(३) होय.
(४) संचालनालयाच्या परिपत्रकानुसार संस्थास्तरावर दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांच्या स्तरावरून सदर बाबीचा नियमित आढावा घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.